| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २९० वा | बुधवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## जन गण मन पूर्वी 'वंदे मातरम्' वाजवले जाईल

### ३ मिनिट १० सेकंदांच्या राष्ट्रगीतादरम्यान उभे राहणे आवश्यक; केंद्राची नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने 'वंदे मातरम' संदर्भात नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, आता जेव्हा 'वंदे मातरम' कोणत्याही सरकारी कार्यक्रमात, सरकारी शाळांच्या कार्यक्रमात किंवा इतर औपचारिक समारंभांमध्ये वाजवले जाईल, तेव्हा त्याच्या सन्मानार्थ प्रत्येक व्यक्तीने उभे राहणे अनिवार्य असेल.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, राष्ट्रगीत म्हणून 'वंदे मातरम्ची' सहा कडव्यांची ३ मिनिटे आणि १० सेकंदांची आवृत्ती राष्ट्रगान 'जन गण मन' च्या आधी वाजवली जाईल, जेणेकरून सन्मान आणि राष्ट्रीय भावनेचा स्पष्ट संदेश मिळेल.

तिरंगा फडकवताना, कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींच्या आगमनापूर्वी आणि नंतर, राष्ट्राला उद्देशून त्यांची भाषणे आणि संबोधनांपूर्वी आणि नंतर, तसेच राज्यपालांच्या आगमनापूर्वी आणि नंतरच्या भाषणांसह अनेक अधिकृत प्रसंगी 'वंदे मातरम्' वाजवले जाईल.

पद्म पुरस्कार समारंभासारख्या नागरी पुरस्कार समारंभांमध्ये किंवा राष्ट्रपती उपस्थित असलेल्या कोणत्याही कार्यक्रमातही वंदे मातरम्




वाजवले जाईल. तथापि, सिनेमा हॉलना नवीन नियमांमधून वगळण्यात आले आहे.

चित्रपटगृहांमध्ये चित्रपट सुरू होण्यापूर्वी 'वंदे मातरम' वाजवणे आणि उभे राहणे अनिवार्य नसेल. अधिकाऱ्यांच्या मते, हे नवीन निर्देश 'वंदे मातरम'च्या सन्मानाची स्पष्ट दिशा देण्यासाठी तयार करण्यात आले आहेत.

**'वंदे मातरम्'वरील वाद**

गेल्या वर्षी 'वंदे मातरम'वर वाद निर्माण झाला होता, जेव्हा काही मुस्लिम संघटनांनी राष्ट्रगीताच्या पठणाला विरोध केला होता. संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान भाजपने काँग्रेसवर तुष्टीकरणाच्या राजकारणाखाली मूळ सहा कडव्यांच्या गीताला एका कडव्यात रूपांतरित केल्याचा आरोप केला होता.

सध्या राष्ट्रगीत म्हणून मूळ गीताच्या सहा कडव्यांपैकी फक्त पहिली दोन कडवीच गायली जातात. काढलेल्या भागांमध्ये दुर्गासह तीन हिंदू देवींचा उल्लेख आहे.

भाजपने १९३७ मध्ये देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी लिहिलेली पत्रे देखील शेअर केली होती, ज्यात त्यांनी सूचित केले होते की गीताची पार्श्वभूमी मुस्लिमांना अस्वस्थ करू शकते. या मुद्द्यावर झालेल्या चर्चेदरम्यान, भाजपचे माजी अध्यक्ष जेपी नड्डा यांनी जोर दिला होता की राष्ट्रीय गीतालाही राष्ट्रगीत आणि राष्ट्रध्वजाप्रमाणेच दर्जा दिला पाहिजे.

तर, काँग्रेसने असा युक्तिवाद केला की राष्ट्रीय गीतावर हा भर पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या आगामी निवडणुका लक्षात घेऊन दिला जात आहे.

## अजित पवार विमान अपघात तपासासाठी मीच केंद्राला सर्वांत आधी पत्र लिहिले – मुख्यमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती निधनावर त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी शंका उपस्थित केली आहे. हा अपघात नसून घातपातच आहे, असा त्यांचा दावा असून याबाबत त्यांनी काल (१० फेब्रुवारी) सविस्तर माहिती पत्रकारांना दिली. यावर आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. मुंबई महापालिकेत बुधवारी महापौर पदाची निवड झाली, यावेळी ते मुंबई महापालिकेच्या सभागृहात हजर होते. तेव्हा त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

**रोहित पवार काय म्हणाले होते?**

रोहित पवारांनी काही प्रश्न उपस्थित करून म्हटलंय की, मला सामान्य व्यक्ती म्हणून ज्याचं कुठलंच टेक्निकल बॅकग्राउंड नाही, असं वाटतं की हा अपघात नाही. यामध्ये शंभर टक्के घात असू शकतो. हीच माहिती आम्हाला सर्व तपास यंत्रणांकडून हवी आहे. हा अपघात होता की घात होता? म्हणजेच माझी आणि महाराष्ट्रातील असंख्य लोकांची शंका आहे की हा घात होता, असा थेट आरोप रोहित पवारांनी केलाय. रोहित पवारांच्या या आरोपांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आलं.

**तपास यंत्रणांकडून सखोल तपासणी होणार**

त्यावर ते म्हणाले, मी रोहित पवारांची पीसी पाहिली नाही. पण त्याविषयी थोडंफार माहितेय. कोणाच्याही मनात काही शंका असेल तर त्याचं निरसन झालं पाहिजे. आपल्याकडे अनेक तपासयंत्रणा उपलब्ध आहेत. या तपासयंत्रणांकडून सखोल तपास होणं अपेक्षित आहे. त्या पद्धतीने चौकशी सुरू झाली आहे. डीजी सेफ्टी महत्त्वाची तपासणी असते, ती सुरू आहे. ब्लॅक बॉक्स मिळाला आहे. कोणाच्याही मनात काही शंका असेल तर त्यांचं निरसन झालं पाहिजे.

केंद्र सरकारला मीच पहिलं पत्र लिहिलं होतं की या अपघाताची पूर्ण चौकशी झाली पाहिजे. यात ज्या ज्या चुका झाल्या आहेत, त्या चुका सुधारून आपण आपल्या एव्हिएशनला आणि सामान्य नागरिकांना सुरक्षित ठेवू शकू, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## धुळ्यात पोलीस भरतीच्या मैदानी चाचणीला सुरुवात; ९,000 उमेदवार मैदानात

**धुळे/प्रतिनिधी:** पोलीस भरतीच्या मैदानी चाचणीला सुरुवात; १३३ जागांसाठी तब्बल ९,००० अर्ज दाखल धुळे जिल्हा पोलीस दलाच्या पोलीस भरतीच्या पार्श्वभूमीवर आजपासून मैदानी चाचणीला सुरुवात झाली आहे. १३३ जागांसाठी ही पोलीस भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून, पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर ही मैदानी चाचणी पार पडत आहे.

## कॅनडामधील शाळेत बेछूट गोळीबार, 10 जणांचा मृत्यू

**कोलंबिया/वृत्तसंस्था :** कॅनडामधील ब्रिटिश कोलंबियातील एका शाळेत आणि आजबाजूच्या परिसरात एका हल्लेखोराने गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या गोळीबारात १० जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये हल्लेखोराचाही समावेश आहे.

## बारावी परीक्षार्थींचे दयानंद विज्ञानमध्ये गुलाबपुष्प देऊन स्वागत

**लातूर/प्रतिनिधी:** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी परीक्षेच्या पहिल्या दिवशी १२ वी परीक्षार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.दि.१० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या दरम्यान होणाऱ्या महाविद्यालयातील परीक्षा मा.जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार व दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार कॉपीमुक्त व भयमुक्त पद्धतीने सुरळीतपणे सुरू झालेल्या आहेत. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे व इतर मान्यवरांनी परीक्षार्थींना गुलाबपुष्प देऊन त्यांचे मनोबल वाढविले.तसेच परीक्षा यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर,सेल्फ फायनान्सचे प्राचार्यअनिलकुमार माळी,परीक्षा विभाग प्रमुख व परीक्षा केंद्र संचालक प्रा.विजयकुमार मांदळे, प्रा.बळवंत सूर्यवंशी, प्रा.भालचंद्र कोयलवार, डॉ.कोमल गोमारे, प्रा.एस. डी.राठोड, महेंद्र कोराळे,प्रा.जीवन जाधव, प्रा.शैलेश सूर्यवंशी, डी.एम.राठोड, नरसिंग जाधव यांच्यासह इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

## गांधी पर्याय नसून शाश्वत उपचार : किशोर बेळेकर

**लातूर/प्रतिनिधी:** पैशाच्या आधारे चालणाऱ्या जगात मानवी मूल्यांची होत चाललेली झीज अधोरेखित करणारा प्रभावी मूक व्यंगचित्रपट 'गांधी टॉक्स' हा केवळ महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानापुरता मर्यादित न राहता, आजच्या समाजात 'गांधी' या नावाचा नेमका अर्थ काय आहे, असा विचार मांडतो, असे दिग्दर्शक किशोर पांडुरंग बेळेकर यांनी लातूर येथे माध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

अभिजात फिल्म सोसायटी, लातूर यांच्यावतीने 'गांधी टॉक्स' चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. चित्रपटाची संकल्पना स्पष्ट करताना बेळेकर म्हणाले की 'गांधी' हा शब्द दोन भिन्न अर्थांनी वापरला जातो–एक म्हणजे सत्य आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक, तर दुसरा आधुनिक जीवनातील पैसा आणि सत्तेच्या वर्चस्वाचे रूपक. मूकता, प्रतीकात्मकता आणि दृश्यप्रधान कथनशैलीच्या माध्यमातून भौतिकतावादाने मानवी भावना व मूल्ये कशी झाकोळली आहेत, हे या चित्रपटात प्रभावी सामाजिक व्यंगातून मांडले आहे, भारतात पहिला चित्रपट जो बनवला गेला राजा हरिश्चंद्र तो एक मूकपट



होता आणि तो एका मराठी माणसाने अर्थात दादासाहेब फाळकेंनी बनवला आणि तेव्हापासून चित्रपट निर्मितीची सुरुवात झाली, या गोष्टीला १०० वर्षे पूर्ण झाली, १०० वर्षांनंतर ही गोष्ट अभिमानाने साजरी करताना बनवण्यात येणारा चित्रपटही मूकपट असावा आणि ही भावना मनात ठेऊन हा चित्रपट विना संवादच असावा अस मी ठरवलं आणि मी त्यावर काम केल, योगायोगाने मी पण मराठीच आहे.

'पुष्पक' नंतर जवळपास ४० वर्षांनंतर प्रदर्शित झालेला हा मूक चित्रपट असून, त्याच्या संकल्पना आणि कथेसाठी जवळपास २५ वर्षे परिश्रम घेतल्याचे बेळेकर यांनी सांगितले. संवादांशिवाय केवळ दृश्यरचना, पार्श्वसंगीत आणि कलाकारांच्या अभिनयाच्या आधारे भावना, संघर्ष आणि विचार व्यक्त करणे हे मोठे सर्जनशील आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले.

या चित्रपटाचे संगीत ए. आर. रहमान यांनी दिले असून, मूक चित्रपटाला भावनिक आवाज देण्याचे श्रेय त्यांनी रहमान यांना दिले. मूक चित्रपटात संगीतच संवादाचे काम करते. ते प्रेक्षकांना कथानकातून मार्गदर्शन करते आणि प्रत्येक भावनेला अधिक प्रभावी बनवते, असे ते म्हणाले.

सध्या चित्रपटगृहांत प्रदर्शित होत असलेला 'गांधी टॉक्स' लवकरच मराठी आवृत्तीतही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अनुभवी कलाकारांच्या प्रभावी अभिनयावर आधारित हा चित्रपट चेहऱ्यावरील भाव, देहबोली आणि पडद्यावरील उपस्थितीच्या माध्यमातून कथा सांगत प्रेक्षकांना अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करतो, या चित्रपटात साऊथचा सुपरस्टार विजय सेतुपती, अरविंद स्वामी, बॉलिवूड अभिनेत्री आदिती राव हैदरी, मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेते सिद्धार्थ जाधव, महेश मांजरेकर, ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, प्रियदर्शनी इंदलकर, वनिता खरात आदी दिग्गज कलाकारांच्या भूमिका असून हा चित्रपट मराठीसह ५ भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात आला आहे.

या पत्रकार परिषदेला अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, अभिनेते सचिन दानाई, डॉ. स्वप्नील देशमुख, आदित्य कुलकर्णी, अभिषेक बुचके, प्रथमेश जाधव, श्रीनिवास कुलकर्णी, प्रा.डॉ. विश्वास शेंबेकर, डॉ दुर्गा शर्मा, शिवशंकर पटवारी यांच्यासह कला व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी मन: शांती जपावी : डॉ. जगदाळे



**लातूर/प्रतिनिधी:** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणताही न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे. परीक्षा काळात नियोजनबद्ध अभ्यास, कठोर परिश्रम आणि शिस्त याच्या जोरावर निश्चित यश मिळते, असे प्रतिपादन राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांनी केले.

ते हरंगुळ जिल्हा परिषद शाळेत इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'हसत–खेळत अभ्यास व तणावमुक्त परीक्षा' या मार्गदर्शनपर कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना योग्य व सकस आहार, पुरेशी झोप आणि आदर्श दिनचर्या पाळण्याचा सल्ला दिला. नियमित योग व प्राणायाम केल्यास मानसिक व शारीरिक क्षमता वाढून परीक्षेचा ताण कमी होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी भयमुक्त, चिंतामुक्त आणि उत्साहपूर्ण वातावरणात परीक्षेला सामोरे जावे. वेळेचे योग्य नियोजन, लिखाणाची गती, मुद्देसूद उत्तरे आणि स्वच्छ हस्ताक्षर यामुळे परीक्षेत चांगला प्रभाव पडतो, असे मार्गदर्शनही त्यांनी केले.

कार्यक्रमात प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे समाधान करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला होता.

या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका राजकन्या गंभीरे, शंभूदेव केंद्रे, विवेक डोंगरे यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकुमार कांबळे, रामेश्वर गावकरे, अर्चना हेंगणे आदी शिक्षकवृंद व आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.

## प्रभात किरणे

प्रेम, माया, ममता,
जिव्हाळा,कळवळा
ज्यांच्या हृदयी,ठायी, तोच जगी
श्रीमंत त्याची गुणगान गाती,
तीच जगी अमर कितीही भोगले
वैभव, शेवटी तो पामर
– इंजि. नागनाथ
कलवले, लातूर


## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



६ मार्चला राज्याचा अर्थसंकल्प फडणवीस मांडणार...

## चिमटा दयाचा



लातूरच्या जि.प.
अध्यक्ष, अध्यक्षाचा
पेच सुटणार आहे !
महायुतीचा झेंडा फडकला
जाणार आहे !

## ऊर्जा संवर्धनात उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर

**लातूर/प्रतिनिधी:** ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना ऊर्जा मंत्रालयाचा 'ऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५' जाहीर झाला आहे. जिल्ह्यात वीज बचतीबाबत जनजागृती करणे, शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर वाढवणे आणि नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवण्यात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या या प्रयत्नांची दखल घेऊन ऊर्जा मंत्रालयाने हा पुरस्कार जाहीर केला आहे. या सन्मानामुळे लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने ऊर्जा बचतीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली असून, शाश्वत ऊर्जा वापर, सौर ऊर्जेचा अवलंब आणि कार्यक्षम व्यवस्थापन यावर भर दिला. या कामगिरीसाठी कार्यालयाला ऊर्जा संवर्धन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हे प्रशासकीय पातळीवर हरित ऊर्जेचे अनुकरणीय उदाहरण ठरले आहे. एनर्जी ऑडिट २०२२-२३ मध्ये दिलेल्या सर्व सूचनांची जिल्हाधिकारी कार्यालयात अंमलबजावणी करण्यात आली. कार्यक्षम उपकरणांचा वापर, १०० किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्र कल्प, पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा साधनांचा समन्वयित, यथोचित आणि काळजीपूर्वक वापर यामुळे दरवर्षी ५५ हजार युनिट्स वीज बचत होत आहे. याशिवाय जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांना ऊर्जा बचतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी 'ऊर्जादूत' संकल्पना राबवण्यात आली.

राज्यात उद्योग, अभियांत्रिकी, रसायने, औषधे व अन्न प्रक्रिया, मेटल व स्टील, कागद निर्मिती, तेल व रसायने, वस्त्रोद्योग, थर्मल पॉवर, बांधकाम व्यवसाय, स्थापत्य, शासकीय इमारती आणि सर्वसाधारण क्षेत्रांमध्ये ऊर्जा संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था व व्यक्तींना गेल्या १८ वर्षांपासून महाऊर्जा (ऊर्जा मंत्रालय) द्वारे ऊर्जा संवर्धन पुरस्कार देण्यात येत आहेत. त्यानुसार 'ऊर्जा संवर्धन आणि व्यवस्थापन उत्कृष्टता-१८' अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले असून, यामध्ये लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना 'ऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५' जाहीर झाला आहे.

राज्य पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल महाऊर्जा पुणे येथील महाव्यवस्थापक समीर घोडके, लातूर विभागीय महाव्यवस्थापक आनंद कुलकर्णी, ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर आदींनी अभिनंदन व्यक्त केले आहे.

**गेल्या तीन वर्षात जिल्ह्याला मिळालेले महत्वाचे पुरस्कार**

लातूर जिल्ह्याला गेल्या सुमारे तीन वर्षांत मिळालेला हा आठवा राष्ट्रीय तथा राज्य स्तरावरील पुरस्कार ठरला आहे. यामध्ये राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार, लोकसत्ता आणि गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिकल अँड इकॉनॉमिक्सकडून सलग दोन वर्षे प्रथम क्रमांकाचा जिल्हा निर्देशांक पुरस्कार, सशस्त्र सेना ध्वज निधी संकलनामध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार, दिव्यांग मुलांसाठी राबविलेल्या उपक्रमाबाबत स्कॉच अवार्ड, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी पुरस्कार, उद्योग क्षेत्रातील कामगिरीबद्दल 'निर्यात पुरस्कार २०२५', मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत सलग दोन वर्षे पुरस्कार आदी पुरस्कारांचा समावेश आहे.

### सौर ऊर्जेद्वारे वीज निर्मितीमध्येही लातूर जिल्हा अग्रेसर

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत लातूर जिल्ह्यात ६५ प्रकल्प कार्यान्वित झाले असून, त्याद्वारे ३२३ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती होत आहे. तसेच, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना अंतर्गत घराच्या छतावर सौर पॅनेल लावून वीज निर्मिती करून वीजबिल शून्य करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्ह्यातील ११ हजार १२३ लाभार्थ्यांनी घराच्या छतावर सौर पॅनेल बसवले असून, त्याद्वारे ४३.२३ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. यामुळे जिल्ह्यात अपारंपरिक ऊर्जेच्या (नवीकरणीय ऊर्जेच्या) वापराला मोठी चालना मिळाली आहे. वीज निर्मितीमध्ये अग्रेसर असलेल्या लातूर जिल्ह्याला आता ऊर्जा संवर्धनासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## काँग्रेसने आता तरी विचार करावा

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पार पडल्या. यात भारतीय जनता पार्टी नंबर वनवर राहीली आहे. लोकसभा, विधानसभा नंतर, नगरपरिषदा, महानगरपरिषद व नुकत्याच पार पडलेल्या जिल्हापरिषदमध्ये भाजपाचा नंबर एकचा पक्ष ठरला आहे. जनतेनी स्विकारले आहे. यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना व अजित पवार यांची राष्ट्रवादी यांनापन जनतेनी स्विकारले आहे. त्यामुळे महायुतीची सत्ता राज्यात दिसून येत आहे. राज्यात महायुतीचा डंका आहे हे मान्यच केले पाहिजे. सर्वात वाईट स्थिती ही कोणाची आहे तर काँग्रेसची आहे. काँग्रेसला जनता सतत नाकारत आहे. देशात एकेळाळी मोठा पक्ष असलेला व स्वातंत्र्यपुर्व काळापासून कार्यतर असलेला पक्षाला अपयश येत आहे. हे सर्वात मोठी वाईट बाब आहे. वरचेवर काँग्रेसला अपयश येत आहे हे माहिती असून काँग्रेस जनतेसोबत राहात नाही. अजून त्यांनी विचार केला नाही की, आपल्याला जनता का नाकारत आहेत. या मागील कारणाचा शोध घेतला जात नाही. इतरावर ते आरोप करीत आहेत. आता तर विरोधक लोकसभापती यांच्यावर अविश्वासाचा ठराव मांडणार असल्याचे सांगत आहेत. त्यांना हटविण्याची मागणी करणार आहेत. यापुर्वीही असेच उपराष्ट्रपती आदरणीय धनगड यांना हाटविण्याचा प्रयत्न केला. मुळात जनतेपासून काँग्रेस दूर जात आहेत. काँग्रेस पक्षाची लोकसभेत संख्या किती आहे. राज्यात आमदार किती निवडूण आणता आले. त्यापेक्षा या जिल्हा परिषदा किती काँग्रेसच्या ताब्यात आल्या याचा विचार केला पाहिजे. जनतेच्या प्रश्नाशी निगडीत बोलत नाही. वोटचोरीचा आरोप सत्ताधाऱ्यावर सतत करीत आहेत. ती चोरी सिद्धही अजून करता आली नाही. काँग्रेसचे म्हणजे एकमेव राहूल गांधी यांचे काम पंतप्रधान मोदी यांना नावे ठेवणे, अपशब्द वापरणे हे आहे. ते कोणालाही पटणारे नाही. देशाचे प्रमुख नागरिकांबाबत असे अपशब्द सतत वापरणे योग्य नाही. विकासाला विकासाने तोंड द्यावे लागते. शब्दीक बोलणे योग्य नाही. दहा वर्षात काँग्रेस कोठे गेली आहे. त्यापेक्षा आप पक्षाने तरी पंजाबमध्ये कार्यरत आहेत. तसे काँग्रेसने किमान दहा-पाच राज्य ताब्यात घेतले पाहिजे. सतत अपयश पदरी पडत असताना यावर विचार होत नाही. नेते मंडळी चिंतन करीत नाहीत. वास्तविक काँग्रेसने सतत मोदी यांना शिव्या घालणे बंद करावे. पहिल्यांदा जनतेसोबत राहीणे व कार्यकर्त्याशी थेट संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे. राज्यात एकमेव लातूर असा जिल्हा आहे येथे थोडीफार काँग्रेस आहे. ही पुण्याई माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांची आहे. वास्तविक जिल्ह्यात एकमेव लातूर शहराचे आमदार काँग्रेसचे आहेत. भाजपाचे तीन व राष्ट्रवादी अ.प.चे दोन आहेत. नगरपारिषदा काँग्रेसकडे किती आहेत. लातूरची महानगरपालिका काँग्रेसच्या ताब्यात आली याला वसंत चव्हाण जे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष कारणी आहेत त्यांच्या पुण्याईने आली. त्यांनी जे विकासनेते विलासराव देशमुख यांच्या बाबत बोलण्याचा परिणाम दिसून आला. जिल्हापरिषदेत काँग्रेसला अधिक जागा मिळविता आल्या मात्र सत्ता मिळविणे अशक्य आहे. येथे महायुतीची सत्ता येवू शकते. भाजपा व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी व अपक्षांच्या मदतीने महायुतीचा झेंडा फडकेल. काँग्रेसला जिप ताब्यात घेता आली नाही. वास्तविक काँग्रेसच्या नेत्याच्या हाती ग्रामीण भाग ताब्यात आले. मोठ-मोठी साखर कारखाने ताब्यात आहेत. अनेक साखरकारखाने असताना बहुमत मिळविता आले नाही. वसंत चव्हाणामुळे महानगरपालिकेत भागले. या बाबीचा विचार केला पाहिजे की, जनतेचा कौल कोणाकडे व कधीही जावू शकतो. परिवर्तनाची ताकद जनता मतदारात आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. वरचेवर काँग्रेसची स्थिती बिकट होण्याची शक्यता आहे. लातूरात बँका, साखरकारखाने, मार्केट कमेटी आदि हाती असताना एकमेव लातूरचे आमदार काँग्रेसचे आहेत. लातूरचा विचार केला तर तीन भाजपा, दोन राष्ट्रवादी असे संख्याबळ आहे. लातूरात देशमुख हे जनतेला त्रास देत नाहीत. कामे करतात, कार्यकर्त्यावर वचक आहे. एकसुत्रीपना आहे म्हणून राज्यात महायुती तर लातूरात काँग्रेसला बरे दिवस आलेले आहेत. त्यामुळे राज्य व देश पातळीवर काँग्रेसने विचार करून आगामी वाटचाल करावी लागणार आहे. केवळ टिका जनतेला पसंत पडत नाही. हे उघड आहे. अशीच काँग्रेसची स्थिती राहीली तर आगामी काळात भाजपाचे वर्चस्व आपोआप वाढणार आहे. मुळात राज्यात भाजपाची कारगिरी समाधानाची आहे. वसंत चव्हाण यांची चुक किती महागात पडल्याने त्यानंतर ते जाहिर सभेत दिसून आले नाहीत. अशी शिस्त असली पाहिजे. उठसुट पंतप्रधानावर टिका करणे योग्य नाही. आता बहिण भाऊ मिळून मोदी यांच्यावर टिका करण्याशिवाय दुसरे काही दिसून येत नाही का अशी टिका होत नाही. अनेक सामाजिक प्रश्न आहेत. अनेक जनतेच्या समस्या आहेत ते घेवून जर राहुल गांधी सह काँग्रसने मैदानात उतरले तर चांगला दिवस येतील. मुळात कार्यकर्त्याविषयी जी जवळीकता असावयास पाहिजे. ती दिसून येत नाही. त्यामुळे जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थेत काँग्रेसला अपयश आले आहे. आता चार वर्ष पक्षप्रचारास मिळतात. त्यामुळे काँग्रेसने अशी एक मोहिम उघडावी की, पुन्हा गतवैभव मिळू शकेल. सध्याला ज्या काही राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुक अपयश आले या बाबत प्रदेशाध्यक्षांनी चिंतन करणे आवश्यक आहे. काँग्रेस जुना पक्ष व देशाच्या स्वातंत्र्य काळात बऱ्यापैकी काम केल्याने हा पक्ष जीवंत राहवा, वाढवा असे वाटणे स्वाभाविक आहे. जशी राहुल गांधी यांनी पक्षाची सुत्रे हाती घेतल्यापासून भाजपाची वरचेवर प्रगती होत आहे. अनेक राज्य भाजपामय केली आहेत व करीत आहे. आगामी इतर राज्यातील विधानसभेची तयारी दोन वर्षापासून भाजपाने सुरू केली आहे. काँग्रेसची कोणतीही प्रगती दिसून येत नाही. त्यामुळे काँग्रेसने चिंतन करण्याची मोठी गरज आहे. कार्यकर्त्याशी थेट संबंध वाढविण्याची गरज आहे. नसता आगामी काळात चांगले दिवस येतील असे वाटत नाही. सध्याला काँग्रेससाठी जी स्थिती दिसून येते यावरून पक्षाने विचार केला पाहिजे. सध्याला लोकामध्ये काँग्रेसबाबत अस्था कमी होत आहे ती कशी भरून काढता येईल याचा विचार केला पाहिजे.

# मृदगंधाचा सोहळा: त्यागाचे महाकाव्य



स्वार्थ त्यागून परोपकारासाठी झिजणाऱ्या पावसाचा थेंब, ज्वारीचा दाणा आणि मातीचा कण यांच्या समन्वयाचे हे महाकाव्य आहे. सुरक्षितता सोडून जेव्हा दातृत्व, पितृत्व आणि मातृत्व एकत्र येते, तेव्हाच दुष्काळाचा अंत होऊन मृदगंधाच्या रूपाने सृष्टीचे नंदनवन फुलते. स्वतःला वाचवणारे संपतात, पण दुसऱ्यासाठी विरून जाणारेच जीवनाचे खरे अमृत ठरतात हा सार घेऊन मी लीहलेली ही कथा आहे.

गेली तीन वर्षे नभाने धरणीची पाठ फिरवली होती. चौथ्या वर्षीही मृग नक्षत्राचे ढग आले खरे, पण न पडताच निघून गेले. पृथ्वी तडफडत होती. नदी-नाले आटले होते, विहिरी आणि नदी-नाल्यांच्या पात्रांत फक्त भेगा उरल्या होत्या. माणसांचे स्थलांतर सुरू होते आणि तहानलेली जनावरे डोळे मिटत होती, मुकी जनावरे पाण्यासाठी प्राण सोडत होती. आसमंतात केवळ धूळ आणि नैराश्य होते. चराचर सृष्टी मृत्यूच्या सावलीत उभी होती. अशा या भीषण दुष्काळात, सृष्टीच्या कोपऱ्यात तीन जीव आपापल्या नशिबाशी झुंजत होते.

**एक जीव मातीचा कण (थरथरत्या स्वरात)**: तीन वर्षे झाली आभाळाने माझ्याकडे पाठ फिरवली. माझ्या कुशीत भेगा पडल्या, तरीही मी वाट पाहतेय

**दुसरा जीव ज्वारीचा दाणा (कातरपणे):** माझ्या आजूबाजूला माणसं उपाशी आहेत. कोठारात सुरक्षित आहे, पण ही सुरक्षितता मला बोचतेय. मी बीज व्हावं का की दाणा राहावं? बीज होणं म्हणजे स्वतःला गाडणं, पण हजारो जीवांना उभं करणं!

**तिसरा जीव पावसाचा थेंब (आकाशातून, अस्वस्थ):** खाली पाहिलं की हृदय थरथरतं. नद्या कोरड्या, जनावरं मरतायत, माणसं घरं सोडतायत आणि तरीही माझे बांधव म्हणतात, ''इथेच राहा, खाली गेलात तर विराल!'' पण मला वाटतं विरणं म्हणजे संपणं नसतं, विरणं म्हणजे कुणाचं जगणं होणं असतं.

**थेंब पावसाचा**

सावळ्या नभाच्या मिठीत एक इवलासा पावसाचा थेंब आपल्या बांधवांसह सुरक्षित बसला होता. तो त्यांचा सुरक्षित संसार होता. वाऱ्याच्या पंखांवर फिरणारे, आकाशात तरंगणारे घर. वारा भुवरीची (पृथ्वीची) आर्त हाक घेऊन वर आला. त्याच्या श्वासात धरणीची आर्त हाक होती. वारा म्हणाला, ''ढगांनो ऐका! खाली धरणी तडफडतेय. जीवन कोमेजतंय श्वास थांबतोय'' ढगांत कुजबुज सुरू झाली. ''आपण का खाली जायचं?'' ''तिथे उष्णता आहे, नाश आहे!'' ''इथे राहिलो तर आपण टिकू.'' ''तिथे केवळ धूळ आणि उष्णता आहे,'' काही थेंब घाबरून म्हणाले. ''आपण इथे ढगांच्या महालात सुरक्षित आहोत. खाली गेलो तर आपले अस्तित्व संपून जाईल.'' दुसरा थेंब म्हणाला, ''ढगांचं घर सोडायचं? आपलं अस्तित्व जपायला नको का?''

एका इवल्याशा पण धाडसी थेंबाचे मन पाणावले. त्याने खाली पाहिलेएक शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसला होता. त्या नजरेत प्रश्न नव्हता, होती केवळ प्रार्थना. थेंबातले दातृत्व जागे झाले. तो म्हणाला, ''पाणी साठवून ठेवण्यासाठी नाही, तर वाटून देण्यासाठी जन्मतं. स्वतःला वाचवून जगणे हे मरण आहे, पण कुणाचे तरी प्राण वाचवण्यासाठी विरून जाणे हेच खरे जीवन आहे!''

**एक थेंब (अचंब्याने): मग तू?**

इवलासा थेंब: होय, मी जातो. जर माझ्या विरण्यातून कुणाचा श्वास वाचत असेल, तर ते विरणंच माझं अमरत्व आहे. आणि तो थेंब ढगांच्या मिठीतून बाहेर पडला. वारा सोबत जातांना तो म्हणत होता, ''स्वतःला वाचवण्याचा हट्ट म्हणजे अंत, आणि दुसऱ्यासाठी विरून जाणं म्हणजे खऱ्या अर्थानं अनंत होणं.'', ''ढगांच्या महालातलं सुरक्षित मरण स्वीकारण्यापेक्षा, मातीच्या कुशीतलं विरलेलं अमरत्व कधीही श्रेष्ठच!''

**वारा (आदराने):** चल मी तुला धरणीकडे घेऊन जातो.

तो थेंब ढगांच्या मिठीतून बाहेर पडतो आणि वाऱ्याच्या लहरीवर स्वार होऊन मृत्यूच्या दाढेत असलेल्या धरणीकडे झेप घेतो.

**ज्वारीचा दाणा: कोठारातील निर्णय**

इकडे भुवरी एका अंधाऱ्या कोठारात ज्वारीचे दाणे मजेत होते. दुष्काळामुळे ते सोन्यासारखे मोलाचे झाले होते. त्यांना उन्हाची झळ नव्हती की मरणाची भीती. बहुतेक दाणे म्हणत होते,

**(आनंदात):** इथे किती सुरक्षित आहे! ना ऊन, ना वारा बाहेर तर फक्त मृत्यू आहे.

**दुसरा दाणा:** हो ना! दुष्काळात आपण सोन्यासारखे मोलाचे आहोत. इथेच राहूया.

एक धाडसी दाणा तिथे अस्वस्थ होता. तो म्हणतो, ''अरे बाहेर माणूस उपाशी आहे त्याची भूक तुम्हाला दिसत नाही का?'' इतर दाणे हसत त्याला म्हणतात, ''वेड लागलंय का तुला? मातीत गेलास तर संपशील!''

पण एका दाण्याला स्वस्थ बसवेना. त्याला माणसाची भूक आठवत होती आणि मातीत रुजण्याचं स्वप्न. त्याला वावरात (शेतात) जाऊन स्वतःचे अस्तित्व संपवून हजारो दाणे जन्माला घालायचे होते. त्याच्यातील पितृत्व त्याला साद घालत होते. ''कोठारात राहिलो तर आपण केवळ अन्नाचा कण म्हणून संपू, पण मातीत गेलो तर आपण बीज होऊन अमर होऊ,'' तो गर्जून म्हणाला. इतर दाण्यांनी त्याला वेड्यात काढले, तेव्हा तो म्हणाला, ''कोठारात राहिलो तर मी संपेन, मातीत गेलो तर मी वाढेन. बीज होणं म्हणजे नाश नाही, ते पुढच्या जीवनाची सुरुवात आहे.'' दुसरा दाणा तरी संशयाने म्हणाला, ''आणि जर पाऊसच आला नाही तर?'' धाडसी दाणा म्हणाला, ''तरीही प्रयत्न करणं हेच माझं पितृत्व आहे. कुणाच्या तरी पोटात अन्न जाण्याची आशा माझ्या विरण्यात असेल, तर ते विरणं मला मान्य आहे.'' दाण्याने शेतकऱ्याच्या हाताने मातीच्या कुशीत विसावण्याचा मार्ग निवडला.

**व्याकुळ कण मातीचा**

काळी माती ऊन-वाऱ्याने पोळून निघाली होती, वावरातील मातीचा कण सुवर्णकण झाला होता. पण तिची कूस कोरडी होती. तरीही तिच्यातले मातृत्व अजूनही जिवंत होते. ती पावसाच्या थेंबाची आणि त्या बीजाची वाट पाहत होती.

मातीचा कण (थकलेल्या पण मायेच्या स्वरात): ऊन अंग जाळतंय, वारा चिरतोय कूस कोरडी झालीय माझी, पण माझं मातृत्व अजून जिवंत आहे. ''ये रे माझ्या पाडसा, मी तुला माझ्या हृदयात स्थान देईन,'' अशी ती साद घालत होती. मातीने ठरवले होते की,



जर पाऊस आला, तर ती स्वतःचा कणन्‌कण भिजवून त्या बीजाला जन्म देईल. तिने बीजाला कूस दिली आणि पावसाच्या थेंबाची वाट पाहू लागली. दिवस सरले. ऊन चटके देत होतं, वारा अंगावर झेपावत होता, पण विश्वास टिकून होता.

**सृष्टीचा श्वास**

अचानक आकाश बदललं, विजा कडाडल्या! वारा गर्जू लागला. ढगांनी आभाळ व्यापलं. धरणीच्या हाकेला आज उत्तर मिळालं! तो धाडसी थेंब वाऱ्याच्या लहरींवर स्वार झाला आणि थाटामाटात धरणीकडे झेपावला. डोंगर-दऱ्या आनंदल्या. पक्षी पंख पसरून नाचले. झाडं डोलू लागली.

**पावसाचा थेंब (आनंदाने):** आज माझं अस्तित्व विरणार पण त्याच विरण्यात जीवन उगवणार. मी आभाळ सोडलंयधरणीला श्वास द्यायला!

तो थेंब मातीच्या कुशीत उतरला. तो विरला मातीचा कण कुशीत सामावून घेत गहिवरला.

**मातीचा कण:** ये रे थेंबा माझ्या कुशीत विसाव. तुझ्या ओलाव्याने माझं मातृत्व जागं होईल.

त्याच क्षणी मातीच्या कुशीत निजलेला ज्वारीचा दाणा सुखावला.

**पावसाचा थेंब:** मी विरतोय पण नाशासाठी नाही, जीवनासाठी!

**मातीचा कण:** मी कणाकणाने भिजतेय तुला वाढवण्यासाठी!

**ज्वारीचा दाणा:** मी बीज होतोय हजारो जीवांसाठी!

**पावसाचा थेंब**: मग ठरलं! मी आभाळ सोडलं, तू कोठार सोडलं आणि तूमातीआम्हाला कवेत घेतलं. असं काम करूया या दुष्काळालाच उत्तर बनूया, या सृष्टीला नंदनवन करूया!

थेंब मातीत विरताच मातीने दाण्याला घट्ट कवेत घेतले आणि दाण्याने आपला अहंकार सोडून स्वतःला मातीत गाडून घेतले. या तिघांच्या त्यागातून एक अदृश्य ऊर्जा निर्माण झाली. तो केवळ पाऊस नव्हता, ते जीवनामृत होते. मातीचा तो सुगंधमृदगंधसंपूर्ण सृष्टीत दरवळला.


काही दिवसांतच त्या मातीच्या कुशीतून इवलेसे हिरवे अंकुर वर आले. पाहता पाहता अवघा शिवार हिरवागार झाला. नद्या वाहू लागल्या, पक्षी परतले, गाऊ लागले आणि माणसाच्या डोळ्यांतील पाणी पुसले गेले. सृष्टी पुन्हा सुजलाम-सुफलाम झाली.

पण त्यांचं काय झालं जे बाहेर पडले नाहीत? मातीत न मुरलेले, ढगात राहिलेले थेंब उन्हाच्या तडाख्याने वाफ होऊन आकाशातच जिरून गेले. कोठारातील दाण्यांना कीड लागली आणि उंदरांच्या झुंडींनी कुरतडून ते कुजले. खडकावरची माती वाऱ्यासोबत उडून गेली.

तेव्हा पूर्वेला आपली सहस्र किरणे सोबत घेऊन उगवलेला सूर्य म्हणाला, ''स्वार्थाचा त्याग करून जेव्हा कर्तव्य, समन्वय आणि दातृत्व एकत्र येतात, तेव्हाच जीवन फुलते. जो स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न करतो तो संपतो, पण जो दुसऱ्यासाठी झिजतो तोच सृष्टीच्या चक्रात अमर होतो.'' सुर्य गालात हसला आणि म्हणाला अरे माणसा माणसा एवढ तरी शिकशील का ? ''मृदगंध हा केवळ मातीचा सुगंध नसून, तो थेंब, कण आणि बीजाच्या सामूहिक त्यागाचा उत्सव आहे.'' ''जेव्हा कर्तव्य, समन्वय आणि दातृत्व एकत्र येतात, तेव्हाच सृष्टीचा श्वास आणि माणसाचा विश्वास पुन्हा जिवंत होतो.''

एक थेंब, एक कण, एक बीज त्यागातूनच जीवन फुलतं आणि सृष्टीचा श्वास बनतो मृदगंध. आणि याच मृदगंधाचे गाणे सगळे गाऊ लागेले,

पण ज्यांनी गाडले स्वतःला, ते अमर होऊन उरले, त्यांच्याच



बलिदानाचे फूल, ।।मृदगंध।। होऊन दरवळले!........

**कथा लेखक - राहूल हरीभाऊ इंगळे पाटील**

# बंजारा समाजाचे शीख धर्मातील महत्त्व

भारतीय सामाजिक-आर्थिक इतिहासात बंजारा समाजाचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. मध्य 'युगीन काळात संपूर्ण भारतभर व्यापार, वाहतूक आणि पुरवठा व्यवस्था सांभाळणारा हा समुदाय केवळ आर्थिकच नव्हे, तर धार्मिक-सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वाची भूमिका बजावतो. शीख इतिहासातील लखीशाह (लाखा) बंजारा यांचे योगदान हे त्याचे सर्वोत्तम उदाहरण मानले जाते. श्री गुरु तेगबहादूर साहेब जी यांच्या शहीदीनंतर त्यांची केलेली सेवा, तसेच त्या काळातील बंजारा समाजाचे व्यापारी सामर्थ्य, हे दोन्ही घटक शीख-बंजारा संबंधांचे सशक्त द्योतक आहेत.

**लखीशाह बंजारा यांचे शीख समाजातील महत्त्व**

इ.स. १६७५ मध्ये मुघल सत्तेने श्री गुरु तेगबहादूर साहेबजी यांना दिल्लीत शहीद केले. त्या काळात भयावह वातावरण होते; कोणालाही गुरुजींच्या पार्थिवाला स्पर्श करण्याची हिंमत होत नव्हती. अशा वेळी लखीशाह बंजारा, जे एक नामांकित व्यापारी व कारवाँ प्रमुख होते, त्यांनी एकाच वेळी हजारो बैलगाड्या एकत्रित केल्या. आपल्या जीवाची पर्वा न करता गुरुजींचे पवित्र शरीर आपल्या गाडीत लपवून दिल्लीतील रायसीना परिसरात नेले.एकाच वेळी आलेल्या हजारो बैलगाड्या त्यांनी उडालेला धुराळा यामुळे त्यांच्या मनातील पवित्र कार्य कोणाच्या लक्षात आले नाही. नंतर आपल्या घराला आग लावून त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले, जेणेकरून मुघल अधिकाऱ्यांना संशय येऊ नये. आजचे गुरुद्वारा रकाब गंज साहिब हे त्याच बलिदानाची साक्ष देणारे पवित्र स्थळ आहे.या ठिकाणी एक भव्य सभागृह आजही त्यांच्या नावाने उभे आहे.या घटनेमुळे लखीशाह बंजारा हे शीख परंपरेत त्याग, निष्ठा आणि मानवतेचे प्रतीक ठरले आहेत.

**श्री गुरु तेगबहादूर साहेबजींच्या कार्यात सहभाग**

गुरु तेगबहादूर साहेबजी हे धार्मिक स्वातंत्र्य, मानवाधिकार आणि सर्वधर्मसमभावाचे पुरस्कर्ते होते. काश्मिरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी त्यांनी प्राणांची आहुती दिली. लखीशाह बंजारा यांनी केलेली सेवा ही गुरुजींच्या मूल्यांचीच पुनरावृत्ती होती.धर्मापलीकडे जाऊन मानवतेसाठी उभे राहणे, ही शिकवण त्यांनी आपल्या कृतीतून दिली.म्हणूनच शीख परंपरेत बंजारा समाजाला ''सेवाभावी सहचर'' म्हणून सन्मान दिला जातो.

**३५० वर्षापूर्वीचा बंजारा समाजाचे व्यापारी महत्त्व**

मुघल काळात बंजारा समाज हा उपखंडातील सर्वात मोठा स्थलांतरित व्यापारी वर्ग मानला जात असे. धान्य, मीठ, कापड, कच्चा माल आणि लष्करी पुरवठा हे मुख्य व्यवसाय. त्या काळातील असुरक्षितता आणि लुटालुट लक्षात घेऊन या समाजाने समुदायातून व्यापार केला.स्वसंरक्षण आणि त्यासाठी आवश्यक शस्त्रकला यामध्ये हा समाज पारंगत होता.भटकंती संदर्भातील रस्ते, जोखीम आणि प्रसंगी लढण्याचे कसब त्यांना अवगत होते. देशाटन करण्याची कला या समुदायाने विकसित केली होती.मोठ्या बैलगाड्यांच्या तांड्यांद्वारे (कारवाँ) हजारो किलोमीटरचा प्रवास केला जात असे.

मुघल लष्कराचा अन्नपुरवठा प्रामुख्याने बंजाऱ्यांकडून होत असल्याची नोंद तत्कालीन प्रशासनिक कागदपत्रांत आढळते. दुष्काळी परिस्थितीतही अन्नधान्याची वाहतूक करून त्यांनी राजकारभार स्थिर ठेवला.

**तत्कालीन व्यापार व्यवस्था**

बंजारा समाजाची व्यापार व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध होती. प्रत्येक तांड्याला नायक, कारभारी आणि राखणदार असत. मार्ग, पाणवठे, विश्रांतीस्थळे यांची पूर्वनियोजित माहिती त्यांना असे. व्यवहार बहुधा विश्वासावर आधारित, पण ठराविक संकेत आणि मौखिक करारांवर चालत. ही व्यवस्था आजच्या लॉजिस्टिक्स सिस्टीमची आद्य आवृत्ती मानली जाते.त्यांच्या तांड्याची रचना व त्यातून कामाचे वाटप यामुळे अनेक वर्ष हा समुदाय शिस्तबद्ध व्यापारी समुदाय म्हणून सन्मानित केला जातो.या समाजाकडे असणाऱ्या दळणवळण,मनुष्यबळामुळे तत्कालिन राजकीय चौकटीत या समाजाला फार महत्व प्राप्त झाले होते.

**हिंदू समाजातील बंजारा समुदायाचे महत्त्व**

बहुसंख्य बंजारा समाज हिंदू परंपरेत मोडतो.सण, उत्सव, चालीरीती आणि त्यांचे वार्षिक नियोजन यामुळे या समाजाच्या मान्यतांना विविध समाजात प्रतिष्ठा प्राप्त होती.स्वत:ची भाषा,संगीत,खानपान पद्धती,आयुर्वेद व औषध शास्त्राचे उत्तम जाण यामुळे त्यांना अन्य सम ाजात प्रतिष्ठा होती.त्यांनी देशभरच्या ग्रामीण-शहरी भागांना जोडण्याचे काम केले. स्थानिक बाजारपेठा, मंदिरे, यात्रास्थळे आणि राजकीय केंद्रे यांना आवश्यक वस्तू पुरवून सामाजिक एकात्मता वाढवली. देशभरातील स्वत:च्या समाजातील उत्सव सोबतच अन्य धर्मीयांच्या उत्सवाची माहिती व त्या दृष्टीचे बिनचूक वार्षिक नियोजनामुळे बंजारा समाज हा केवळ व्यापारी नसून, सांस्कृतिक दुवा ठरला, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**भाषा, पेहराव आणि अखिल भारतीय सूत्र**

बंजारा समाजाची गोरबोली (लामणीलभाणी) ही भाषा संपूर्ण भारतात वेगवेगळ्या प्रादेशिक प्रभावांसह आढळते. हा एक अखिल भारतीय भाषिक सूत्र आहे. स्त्रियांचा रंगीबेरंगी पोशाख, भरजरी दागिने, पुरुषांचा साधा पण प्रवाससुलभ पेहराव,हे सर्व त्यांच्या स्थलांतरित जीवनशैलीशी सुसंगत होते. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत या समाजाने आपले वैशिष्ट्य, भाषा, पेहराव,खानपान यामध्ये एकसूत्री पण ठेवले. कोणत्याही ठिकाणच्या बंजारा समाजाच्या भाषा आणि राहणीमान हे एक दुसऱ्यांसोबत कितीही वर्ष विलग राहिले तरी बदलू न देण्याची हजारो वर्ष परंपरा त्यांनी जपली.अनेक धर्माचे अनेक पंथाचे व चालीरितीचे शासन आले तरी त्यांनी आपली संस्कृती जतन केली. त्यामुळे हा

समाज सर्वकालीन समाज व्यवस्थेत देशाच्या कानाकोपऱ्यात आपल्या सन्मानाने आणि लढवय्या बाण्यामुळे तटस्थ आणि वेगळेपण अधोरेखीत करीत गेला.

**लाखा बंजारा यांचे व्यापारातील स्थान**

लखीशाह बंजारा हे केवळ धार्मिक सेवक नव्हते; ते त्या काळातील यशस्वी व्यापारी होते. दिल्लीसारख्या राजधानीत त्यांचे निवासस्थान आणि व्यापारी जाळे होते. तीन ते चार शतकांचा व्यापाराचा त्यांचा अनेक पिढयांचा अनुभव होता. आपल्या मेहनतीने, प्रामाणिकपणाने आणि व्यापार पूरक साहित्य - सुविधांनी त्यांनी गौरवशाली परंपरा निर्माण केली होती. स्वत:चा एक समुदाय,व्यापाराचा वकूब,शब्दाला जपण्याची स्थिरता,धर्माचा स्वाभिमान,व्यवहारातील पारदर्शिता, वक्तशीरपणा,आणि लढाऊ वृत्तीमुळे आदर युक्त दहशत या समाजाची तत्कालीन व्यवस्थेत होती. त्यामुळेच गुरुजींच्या पार्थिवाला सुरक्षितपणे हलवणे त्यांना शक्य झाले.

**शीख आणि बंजारा समाजाचा संबंध**

लखीशाह बंजारा यांच्या कृतीमुळे शीख-बंजारा संबंध दृढ झाले. पुढील काळात अनेक बंजारा कुटुंबे शीख गुरुद्वारांच्या सेवेत सहभागी झाली. देशभरातील दोन्ही समाजांचा वावर.ठिकठिकाणी व्यापारासाठी व धर्मप्रसारासाठी जाणारे जत्थे व तांडे यातील स्थलांतर हा समान धर्म.विविध वातावरणात अस्तित्व टिकवण्याची परस्पर सांगड. लंगर व्यवस्था, प्रवासातील मदत, आणि आपत्कालीन सेवा या क्षेत्रांत दोन्ही समाजातील साम्य या समुदायाला सहजीवनासाठी उपयुक्त ठरला.त्याम ुळे देशात या दोन्ही समुदायाने तत्कालीन व्यवस्थेत समान धर्मीय म्हणून मान्यता प्राप्त केले होती.ही व्यवस्था दोन्ही समुदायांच्या संबंधाला काळाच्या कसोटीवर सिद्ध करणारी ठरली आहे.

**श्री गुरु ग्रंथ साहेब ग्रंथामध्ये आदराने उल्लेख**

गुरुजींच्या शहादतीमध्ये या समाजाने दाखवलेल्या अतुलनीय पराक्रमाचा उल्लेख शिखांच्या पवित्र श्री गुरु ग्रंथ साहेब जी ग्रंथात आहे. तथापि,गुरुमुखी या लिपीमध्ये असलेल्या या पवित्र ग्रंथात थेट ''बंजारा'' असा उल्लेख क्वचित आढळतो; मात्र सेवा, त्याग, समता आणि मानवता ही मूल्ये बंजारा समाजाच्या जीवनपद्धतीशी सुसंगत आहेत. शीख परंपरेतील सेवाभावात बंजारा समाजाचा आत्मा प्रतिबिंबित झालेला दिसतो. त्यामुळे शेकडो वर्षापासून परस्परांच्या मान्यतेत व अस्तित्वात दोन्ही समाजाने एकमेकांचा आदर केला आहे.

लखीशाह बंजारा यांचे बलिदान, बंजारा समाजाचे व्यापारी साम र्थ्य आणि शीख धर्माशी असलेले नाते हे सर्व भारतीय इतिहासातील सामाजिक ऐक्याचे उत्तम उदाहरण आहे. धर्म, जात किंवा व्यवसाय यापलीकडे जाऊन मानवतेसाठी उभे राहणे हीच या परंपरेची खरी देणगी आहे.

**- प्रवीण टाके**
**९७०२८५८७७७**

# संत एकनाथ

शांतीब्रह्म, 'संत' पदाला पोहोचलेले सत्पुरुष, उच्च कोटीचे समाजसुधारक, महान तत्त्ववेत्ता, संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक अशा अनेक गुणविशेषणांसह 'ज्ञानाचा एका' या बिरुदावलीने सा-या महाराष्ट्राला परिचित असणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे संत एकनाथ! आदर्श गृहस्थाश्रमी, मायमराठीचे सुपुत्र, व्युत्पन्नमति पंडित, दयेचा सागर या शब्दात त्यांचे वर्णन करता येईल. संत एकनाथ हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील सुप्रसिद्ध संत. जन्म इ.स. १५३३ मध्ये पैठण येथे. यांचे मूळ पुरुष भास्करपंत कुलकर्णी, हे प्रतिष्ठान ऊर्फ पैठण नगरीत राहणारे होते. संत भानुदास हे त्यांचे पणजोबा. यांचे कुलदैवत सूर्यनारायण होते. श्री संत एकनाथांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण होते. आईचे नाव रुक्मिणी होते. दुर्दैवाने त्यांना आई-वडिलांचा सहवास फार काळ लाभला नाही. त्यांचे पालनपोषण आजोबांनी केले. चक्रपाणी आणि सरस्वती हे त्यांचे आजोबा व आजी होत. एकनाथांना लहानपणापासून अध्यात्म ज्ञानाची व



हरिकीर्तनाची आवड होती.
एकनाथांचे गुरू सदगुरु जनार्दन स्वामी हे देवगड (देवगिरी) येथे यवन दरबारी अधिपती होते. हे मूळचे चाळीसगावचे रहिवासी; त्यांचे आडनाव देशपांडे होते. ते महान दत्तोपासक होते. सदगुरु म्हणून संत एकनाथांनी यांना मनोमनी वरले होते. जनार्दनपंत हे विद्वान व सत्शील आचरणाचे होते. नाथांनी अथक परिश्रम करून गुरुसेवा केली. साक्षात् दत्तात्रयांनी त्यांना दर्शन दिले. आत्मबोध, पूर्णगुरुकृपा, आणि भगवंत दत्तात्रय यांचे दर्शन यांमुळे नाथांचे जीवन धन्य झाले. नाथांनी अनेक तीर्थयात्राही केल्या. गुरुंकडूनच एकनाथांनी वेदांत, योग, भक्तियोग यांचे शिक्षण घेतले. बराचसा काळ ध्यान आणि वेदाध्ययनात घालवला. गुरूंबरोबर तीर्थयात्रा केल्यानंतर त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला. नाथांनी सदगुणी, सुलक्षणी मुलीशी म्हणजेच गिरिजाशी विवाह केला. ही मुलगी पैठणजवळच्या वैजापूरची होती. त्यांना गोदावरी व गंगा या दोन मुली व हरी नावाचा मुलगा होता. त्यांचा मुलगा हरिपंडित या नावाने प्रसिध्द झाला, परंपरेचा अतिशय अभिमानी होता. कवी मुक्तेश्र्वर हे नाथांचे नातू होत.
संत ज्ञानेश्वरांच्या नंतर सुमारे २५० वर्षांनी नाथांचा जन्म झाला. अतिशय प्रतिकूल परिस्थिती होती. यवनांचे राज्य होते. याच दरम्यान विजयनगरचे हिंदू साम्राज्य बुडाले होते. स्वधर्म, स्वराष्ट्र, स्वराज्य यांविषयी सर्वत्र अज्ञानाचे वातावरण होते. कर्मकांड, कर्मठपणा यावर जास्त भर होता. भर दिवसा स्त्रिया बाटविल्या जात होत्या. धर्मावर अत्याचार होत होता. अशा बिकट समयी नाथांनी समाज सुधारण्यासाठी जगदंबेला साद घातली. 'बये दार उघड' असे म्हणत नाथांनी भारूड, जोगवा, गवळणी, गोंधळ यांच्या साहाय्याने जनजागृती केली. संत एकनाथ हे संतकवी, पंतकवी व तंतकवी होते. रंजन व प्रबोधन करत अध:पतित समाजाला त्यांनी सन्मार्गावर आणले, महाराष्ट्राचा पुरुषार्थ जागविला. ते 'ऐका जनार्दन' म्हणून स्वत:चा उल्लेख करत. ऐका जनार्दनी ही त्यांची नाममुद्रा आहे. त्यांनी संत ज्ञानेश्वरांचे आळंदी येथील समाधीस्थळाचा शोध घेतला.
अनेक रचना, अभंग, गवळणी असे स्फुट लेखन एकनाथांनी केले. 'एकनाथी भागवत' हा त्यांचा ग्रंथ लोकप्रिय आहे. ही एकादश स्कंदावरील टीका आहे. ह्यात एकूण १३६७ श्र्लोक आहेत. परंतु त्यावर भाष्य म्हणून १८,८१० ओव्या संत एकनाथांनी लिहिल्या आहेत. मूळ भागवत १२ स्कंदांचे आहे. हे अतिशय प्रासादिक (व्यासकृत) काव्य आहे. नाथांनी लिहिलेल्या भावार्थ रामायणाच्या सुमारे ४० हजार ओव्या आहेत.
त्यांचे रुक्मिणीस्वयंवर अत्यंत लोकप्रिय आहे. नाथांची दत्ताची आरतीही (त्रिगुणात्मक त्रयमूर्ति दत्त हा जाणा) प्रसिद्ध आहे. या महात्म्याने विपुल वाङ्मय निर्माण करून मराठी भाषा समृद्ध केली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध केली. नाथ हे महावैष्णव होते. दत्तभक्त होते, देवीभक्त पण होते. जातीभेद दूर करण्यासाठी यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. फाल्गुन वद्य षष्ठी, शके १५२१ (इ.स. १५९९) या दिवशी संत एकनाथांनी देह ठेवला व अनंतात विलिन झाले.

# पाठीच्या कण्याचे आरोग्य राखण्यासाठी



नियमित व्यायाम, योग्य पोश्चर (बसण्याची/उठण्याची पद्धत) आणि समतोल आहार घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जड वस्तू उचलताना काळजी घ्या, पाठीवर ताण टाळा आणि दीर्घकाळ एकाच स्थितीत बसणे टाळा, ज्यामुळे कणा सुरक्षित राहील.
पाठीच्या कण्याची काळजी घेण्यासाठी महत्त्वाच्या टिप्स:
योग्य पोश्चर (: बसताना पाठीचा कणा सरळ ठेवा. खुर्चीवर बसताना कंबर आधाराला टेकवून बसा. व्यायाम (एशीलळीश): पाठीचे स्नायू बळकट करण्यासाठी कोअर स्ट्रेन्थनिंग (ऊेश ीींशपसींहशपळपस) व्यायाम, योगासने (उदा. भुजंगासन) आणि चालणे फायदेशीर आहे.
वजन नियंत्रित ठेवा (थशळसहीं चरपरसशाशपीं): शरीराचे जास्त वजन पाठीच्या कण्यावर ताण आणते, त्यामुळे वजन संतुलित ठेवा.
जड वस्तू उचलणे: जड वस्तू उचलताना पाठीऐवजी गुडघे दुमडून आणि पायांच्या ताकदीने वस्तू उचला.समतोल आहार: कॅल्शियम आणि व्हिटॅमिन ऊ युक्त आहार (दूध, दही, पालेभाज्या) घ्या, जे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत.धूम्रपान टाळा धूम्रपानामुळे पाठीच्या मणक्यातील रक्तपुरवठा कमी होतो आणि वेदना वाढू शकतात.
ब्रेक घ्या: कॉम्प्युटरवर काम करताना दर तासाला काही मिनिटांचा ब्रेक घेऊन थोडे चाला किंवा स्ट्रेचिंग करा.



# संवाद आणि संदिग्धता

भ्रष्टाचाराविरुद्ध संघर्ष करणार्यांना संघ पाठबळ देईल, भ्रष्टाचार रोखण्यासाठी कठोर कायदे हवेत, अशी भूमिका भागवत यांनी मांडली. भ्रष्टाचाराचे आरोप असलेले अन्य पक्षांमधील नेते भाजपमध्ये येऊन 'स्वच्छ' बनतात, त्याचे काय?
सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी समान नागरी कायद्यापासून अखंड भारतापर्यंत विविध विषयांवर भाष्य केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीनिमित्त 'नवे क्षितिज' या व्याख्यानमालेत आणि नंतर ज्येष्ठांबरोबर झालेल्या प्रश्नोत्तर कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपली मते मांडली. संघाची भूमिका समाजातील अधिकाधिक घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी असे कार्यक्रम आयोजित करण्यात संघाची नेहमीची कल्पकता दिसते. मात्र; जाहीरपणे भूमिका मांडतानाही काही विषयांवर संदिग्धता कायम ठेवण्याची परंपरा भागवत देखील पाळत आहेत. 'हिंदू धर्मसंज्ञा नव्हे, ते विशेषण आहे', असे भागवत म्हणतात. भारतात राहणारे सर्व हिंदू आहेत, हे त्यांचे म्हणणे; पण कोणीही हिंदू सरसंघचालक होऊ शकतो, हे सांगताना त्यांच्या डोळ्यासमोर विशेषण असलेला 'हिंदू' शब्द नाही, हे उघड आहे! 'गर्वसे कहो हम हिंदू हैं' हे म्हणणारा वर्ग भारतात आहे आणि हिंदू असल्याचा विसर पडलेला वर्गही आहे, त्यांना स्मरण करून देत सोबत घ्यायचे आहे', या त्यांच्या विधानाचा निर्देश धर्मसंज्ञेकडेच होतो!
मताचे राजकारण
संघ परिवारातील संघटनांनी गेल्या काही दशकांत आक्रमक हिंदुत्वाला खतपाणी घालत राजकीय सत्ताप्राप्तीकरता वातावरण निर्मितीसाठी पावले टाकली. यातून भारताच्या सामंजस्याच्या स्वभावावर प्रश्नचिन्ह उभे राहते आणि धर्मा-धर्मातील सौहार्दामध्ये दुभंगलेपण येते, याची संघाने फिकीर केली नाही. 'एक देश, एक कायदा', हे तत्त्व योग्यच आहे. मतांच्या राजकारणासाठी त्याकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष झाले, हेही नाकारता येत नाही; पण कोणी काय खावे आणि काय प्यावे, हे सांगण्याचा उपद्व्याप विविधतेतून साकारलेल्या भारताच्या एकतेला हितकारक ठरणार का? यावर संघाचे ज्येष्ठ भाष्य करत नाहीत. खाण्यापिण्याच्या दुकानांची, हॉटेलांची मालकी कोणाकडे आहे, हे सार्वजनिक करण्यामागील मानसिकता उत्तरप्रदेशात रुजते याचा संघाला विषाद वाटल्याचे ऐकिवात नाही. मग, संवाद आणि समन्वयातून समान नागरी कायदा करावा, या अपेक्षेची पूर्तता होणार कशी आणि कधी? भागवत यांनी उत्तराखंडाचे उदाहरण दिले. तेथे आज समान नागरी कायदा लागू आहे. तो आणण्यापूर्वी तीन लाख सूचना आल्या, त्यावर विचार होऊन कायदा अंमलात आला, असे भागवत यांनी म्हटले आहे. उत्तराखंडाचे उदाहरण असंख्य जाती-जमाती, धर्म असलेल्या विशाल देशासाठी प्रातिनिधिक ठरू शकत नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. फाळणीने प्रश्न सुटतील, ही त्या काळातील अपेक्षा होती. ती फोल ठरली. धर्माच्या आधारावर निर्माण झालेल्या पाकिस्तानने भारताचे सर्वप्रकारे नुकसान करण्याचे विषारी ध्येय ठेवून वाटचाल केली. यातून तो देश विनाशाच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. २०४७ पर्यंत अखंड भारताचे स्वप्न साकारण्याचे भागवत यांचे आवाहन आहे; पण हिंदुत्वाच्या नावाखाली अलीकडच्या काळात टोकाच्या आक्रमकपणाचे जे दर्शन घडत आहे त्यातून आपल्याला 'हिंदू पाकिस्तान' तर बनवायचा नाही ना? असा प्रश्न विचारला जाऊ लागला. २०१४ पासून भारतीय जनता पक्ष सलग सत्तेवर आहे. संघ ही भाजपची मातृसंस्था. संघाच्या शताब्दीचे औचित्य आणि भाजपकडे असलेली देशाची सूत्रे, यामुळे खरेतर संघ आणि भाजपमध्ये सुसंवादाची प्रचिती येणे अपेक्षित होते. तसे घडले नाही. भाजपची सत्ता असल्याने 'संघासाठी अच्छे दिन आलेत का?' या प्रश्नावर, भाजप- ला संघामुळे अच्छे दिन आले, असे भागवत यांचे उत्तर होते. यात मात्र मतमतांतरे होऊ शकत नाहीत! भाजपला आता संघाच्या मदतीची आवश्यकता नाही, असे विधान पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी ऐन लोकसभा निवडणुकीच्या वेळी केले. ते भाजपला चांगलेच भोवले आणि चारशे पार, हे भाजपसाठी स्वप्नच राहिले. मग विधानसभांसाठी संघच मदतीला धावला! मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मीयांबरोबर संवाद वाढविण्याचे सूतोवाच भागवत यांनी केले. ही स्वागतार्ह बाब आहे. तो संवाद सुसंवादात रूपांतरित व्हावा, यासाठी विखारी विधाने करणार्या आपल्या परिवारातील नेते मंडळींना आवर घालण्याचे धारिष्ट्य त्यांना दाखवावे लागेल. त्यातून होणारी भाजपची राजकीय गैरसोय संघाला चालणार का?

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

**भारतीय सभ्यता आणि लैंगिकता**-शेतीच्या प्रारंभिक शोधानंतर साडेचार ते पाच हजार वर्षांपूर्वी सुमेरियन, इजिप्शियन आणि इंडस (सिंधू) सभ्यतेचा उदय झाला. परस्पर समांतर काळात विकसित झालेल्या या सभ्यतांमध्ये बहुविध समाजरचनेतून आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक शांतता साधली गेल्याचे पुरावे मिळतात. या स्थिर, शांत आणि प्रगतिकारक वातावरणात साहित्य, संगीत आणि चित्र-शिल्प कला मोठ्या प्रमाणावर विकसित झाली. (क्रमशः)




## २ Joke — विनोद





विश्व
राज : आई मी पोहायला जाऊ का?
आई : नको, पाणी खोल आहे आणि लाटाही जास्त आहेत.
राज : पण बाबा पोहतात त्याचे काय?
आई : त्यांचा विमा उतरवलेला आहे.

## ३ Message — संदेश



Kab unki palkon se izhaar hoga,
dil ke kisi kone mein hamare liye pyar hoga,
guzar rahi hai raat unki yaad mein,
kabhi to unko bhi hamara intezar hoga.

## ४ Thought — सुविचार




खोबरे पाहिजे असेल तर नारळ फोडलाच पाहिजे.
– जे. ग्रॅंज

**संस्कृत सुभाषित**

**प्राणाः प्राणभृतामन्नं तदयुक्त्या निहन्त्यसून ।**
**विषं प्राणहरं तच्च युक्तियुक्तं रसायनम्।।**

**अर्थः** अन्न हे सर्व प्राणीमात्रांचे जणू प्राणच ठरते पण अयोग्य अन्न सेवन केल्यास तेच विष बनून प्राणांचे हरण करते परंतु विचाराने व युक्तीवादाने अन्न ग्रहण केल्यास अयोग्य अन्नसुद्धा उपकारक रसायन ठरते.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. प्रणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
११. प्रचंड, तीव्र
१३. नजरफेक
१६. गालबोट
१७. मौज करणे
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृत्तिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी
३८. दूर गेलेला
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाचे प्रमाण
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. विजार
५७. परिस्थिती
५८. पंजातील बिननावाचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. दरी
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. किरकोळ सामान
७९. जयाचा नामघोष

### उभे शब्द

१. तरूण, सैनिक
२. भार
३. रावणाच्या तोंडांची संख्या
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. नवरा
७. संकटातून निभावणे
८. मित्राचे सोंग घेतलेला शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. माती, वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कणा
१९. एक पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. रत्न
३१. भूपती
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. हिंदीतील रहस्य
४०. रम्य, मनोहर
४१. भूतकाळ
४२. दाढीच्या जोडीची
४४. जननी
४५. साप्ताहिक सुट्टीचा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. जनावरांचे पिल्लू
५३. पोरका
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. निरुपयोगी

### आडवे उत्तर

१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहितगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजामा ५७.हालहवाल ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.सटरफटर ७९.जयजयकार

### उभे उत्तर

१.जवान २.वजन ३.दहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यथार्थ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.राजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.गतकाल ४२.मिशी ४४.माता ४५.रविवार ४६.तार ४९.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.अनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पात ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय




## थोडक्यात/ संक्षिप्त



### मॅच होणार, बहिष्कारानंतर मोहसीन नक्कीला लाज, म्हणून बांगलादेशने केली घोषणा

ढाका –भारत आणि पाकिस्तान सामन्यातील बहिष्काराच्या वादावर अखेर पडदा पडला आहे. त्यामुळे आता श्रीलंकेच्या कोलंबोतील आर प्रमेदासा स्टेडिअमम ध्ये येत्या १५ फेब्रुवारी २०२६ चा हायव्होल्टेज सामना पार पडणार आहे. विशेष म्हणजे या गोष्टीची पाकिस्तान सरकार किंवा पाकिस्तान बोर्डाकरून अधिकृत घोषणा करण्यात आली नाही आहे. पण ज्या बांगलादेशमुळे पाकिस्तानने भारताविरूद्ध ही भूमिका घेतली.त्या बांग्लादेश बोर्डाचे अध्यक्ष अमीनुस इस्लाम बुलबुल यांनी एक पत्रक जारी करून पाकिस्तानने भारतासोबत टी२० वर्ल्ड कप मॅच खेळावा असे म्हटले आहे.

### भारत पाकिस्तान मॅचचे ठरले अन् आयसीसीचे तब्बल इतक्या मिलिअन डॉलर्सचे नुकसान टळले

**नवी दिल्ली** –टी२० वर्ल्डकपमध्ये भारत–पाकिस्तान सामना होणार हे ठरताच मुंबई कोलंबो प्रवासाचे तिकीट १०,००० वरून ६०,००० वर जाऊन पोहा- चलं आहे. आठवडाभराच्या वाटाघाटींनंतर तिढा सुटला असून रविवारी ठरल्याप्रमाणे ही लढत होणार आहे. या लढतीसाठी भारतातून मोठ्या प्रमाणावर चाहते श्रीलंकेसाठी रवाना होणार असल्याने मुंबई कोलंबो विम ान प्रवासाच्या तिकिटांचे दर अव्वाच्या सव्वा पातळीवर गेले आहेत. पाकिस्तानचा संघ भारतात येत नसल्याने त्यांच्या लढती श्रीलंकेत होणार आहेत.पाकिस्तानने आठवडाभर आधी भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला होता. पाकिस्तानच्या सरकारने क्रिकेट बोर्डाला अशी सूचना केली होती. या निर्णयामुळे आयसीसी तसंच प्रक्षेपणकर्त्या कंपनीचे मोठे नुकसान होणार होते. पाकिस्तानने भूमिकेत बदल करावा यासाठी आठवडाभर वाटाघाटी झाल्या. आयसीसीचे एक पथक पाकिस्तानात दाखल झालं. त्यांनी पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांची भेट घेतली. बांगलादेशचे क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष अमिनुल इस्लाम इस्लामाबादमध्ये होते.

### वर्ल्ड कपदरम्यान मोठा वाद, या स्टार क्रिकेटरला थेट संघातून दाखवला बाहेरचा रस्ता, नेमकं कारण काय?

**मुंबई**–टी२० वर्ल्ड कप २०२६ ला ७ फेब्रुवारी पासून सुरुवात झालेली आहे. यंदा स्पर्धेत एकूण २० संघांनी सहभाग घेतला असून त्यांच्यात सध्या ग्रुप स्टेज सामने खेळवले जात आहेत. अशातच मंगळवारी यूएई विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात सामना खेळवला जाणार असून यापूर्वी यूएई संघातील एका स्टार खेळाडूला थेट संघातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. टी२० वर्ल्ड कप २०२६ मध्ये यूएईचा संघ मंगळवारी न्यूझीलंड विरुद्ध २०२२ नंतर त्यांचा पहिला वर्ल्ड कप सामना खेळणार आहे. मात्र त्यापूर्वी सोमवारी यूएई संघातील मोहम्मद ज़ोहैब या क्रिकेटरला शिस्तभंगाची कारवाई केल्याच्या कारणाने परत मायदेशात पाठवण्यात आलं आहे. सोमवारी एमिरेट्स क्रिकेट बोर्डाने याबाबत एक स्टेटमेंट जाहीर करत या प्रकरणातील अधिक माहिती वेळ आल्यावर दिली जाईल असं त्यांनी म्हटलं आहे. यूएईच्या वर्ल्ड कप संघातील टॉप ऑर्डरमधील फलंदाज बाहेर पडल्याने फलंदाजीच्या क्रमवारीवर दबाव पडला आहे. शुक्रवारी इटलीच्या विरुद्ध यूएईने खेळलेल्या सराव सामन्यात यूएईचा संघ ८१ धावांवर ऑल आउट झाला होता.

# सचिनच्या घरात लगीनघाई! लग्नसोहळ्यासाठी खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी मुंबई:** सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकर व सानिया चंडोक यांच्या लग्नाच्या बातम्यांनी सर्वत्र चर्चांना उधाण आलं होतं. यादरम्यान आता सचिन तेंडुलकरने एक पोस्ट शेअर केली आहे.

सचिन तेंडुलकरच्या घरी लगीनघाई म ास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकर लग्नबंधनात अडकणार असल्याच्या चर्चा २०२६पासून सुरू आहेत. अर्जुन तेंडुलकर सानिया चंडोकबरोबर लग्न करणार आहे आणि त्यांच्या लग्नाची तारीखही रिपोर्ट्समध्ये समोर आली होती. अर्जुन व सानिया यांनी २०२५ मध्ये खाजगी समारंभात साखरपुडा उरकला होता. या लग्नाच्या चर्चांदरम्यान आता सचिन तेंडुलकरने पोस्ट शेअर करत लग्न होणार असल्याच्या चर्चांवर शिक्कमोर्तब केला आहे.



अर्जुन तेंडुलकर व सानिया चंडोक यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये खाजगी सोहळ्यात साखरपुडा केला होता. दोन्ही कुटुंबीय व जवळचा मित्रपरिवार यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला होता. तेंडुलकर व चंडोक कुटुंबियांनी गुपचूप साखरपुडा उरकल्यानंतर आता २०२६ मध्ये लग्नसोहळा पार पडणार आहे. यासाठी तेंडुलकर व चंडोक परिवार भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निमंत्रित करण्यासाठी गेले होते.रिपोर्ट्सनुसार, अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोक ५ मार्च २०२६ रोजी लग्न बंधनात अडकणार आहेत. लग्नापूर्वीचे विधी ३ मार्चपासून सुरू होतील. तर ४ मार्चला होळीचा सण देखील असणार आहे, त्यामुळे सणादरम्यान लग्नसोहळा असल्याने जोरदार सेलिब्रेशन होईल. या लग्नसोहळ्याला भारतातील अनेक दिग्गज व्यक्ती उपस्थित राहण्याची शक्यता आहे.सचिन तेंडुलकरसह पंतप्रधान नरेंद्र मोदींना लग्नाचं आमंत्रण देण्यासाठी तेंडुलकर व चंडोक कुटुंब उपस्थित होतं. सचिन पत्नी अंजली तेंडुलकर, लेक सारा तेंडुलकर, अर्जुन तेंडुलकर याचबरोबर सानिया चंडोक व तिचे आईबाबाही उपस्थित होते.यादरम्यान पंतप्रधान मोदींनी अर्जुन व सानियाबरोबर फोटोही काढला आणि त्यांना लग्नाच्या शुभेच्छादेखील दिल्या. सचिनच्या या पोस्टमुळे अर्जुन व सानियाच्या लग्नाच्या रिपोर्ट्सना दुजोरा मिळाला असून सर्वांच्या नजरा आता या लग्नसोहळ्यावर असतील.

# टी-२० वर्ल्डकपमध्ये पहिल्यांदाच असे घडले! स्कॉटलंडने इतिहास घडवला



### टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत २०० धावांचा पल्ला गाठणारा पहिलाच संघ

**दिल्ली**–इटलीचा संघ आयसीसी टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत आपला पहिलाच सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला. त्यामुळे इटलीच्या खेळाडूंसाठी हा ऐतिहासिक क्षण होता. इटलीचा पहिला सामना स्कॉटलंड संघाविरूद्ध पार पडला. या सामन्यात इटलीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या स्कॉटलंडने २० षटकांअखेर ४ गडी बाद २०७ धावांचा डोंगर उभारला. या सामन्यात २०० धावांचा पल्ला गाठताच स्कॉटलंड संघाच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. स्कॉटलंडचा संघ हा असोसिएडेट राष्ट्र म्हणून टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत २०० धावांचा पल्ला गाठणारा पहिलाच संघ ठरला आहे. या सामन्यात स्कॉटलंडकडून फलंदाजी करताना जॉर्ज मुंसीने सर्वाधिक ८४ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर स्कॉटलंडने २०० धावांचा पल्ला गाठला. याआधी कुठल्याही असोसिएडेट राष्ट्राला टी–२० वर्ल्डकपमध्ये २०० धावांचा पल्ला गाठता आला नव्हता. याआधी अमेरिकेने कॅनडाविरूद्ध खेळताना १९७ धावा केल्या होत्या. आता २०७ धावांचा डोंगर उभारून अमेरिकेचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. गेल्या सामन्यात स्कॉटलंडच्या फलंदाजांना चांगली सुरूवात मिळाली होती. पण ते धावांचा यशस्वी पाठलाग करू शकले नव्हते. या सामन्यात स्कॉटलंडच्या फलंदाजांनी सुरूवातीपासूनच तुफान फटकेबाजी केली.

हा सामना स्कॉटलंडने ७३ धावांनी आपल्या नावावर केला आहे. यासह हा असोसिएडेट राष्ट्राचा टी–२० वर्ल्डकप स्पर्धेतील दुसरा सर्वात मोठा विजय आहे. याआधी २०१४ मध्ये झालेल्या टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत नेपाळने हाँगकाँगवर ८० धावांनी विजय मिळवला होता. या रेकॉर्ड अजूनही कोणत्या संघाला मोडता आलेला नाही. त्यानंतर २०१६ मध्ये अगाणिस्तानने झिम्बाब्वेविरूद्ध झालेल्या सामन्यात अफगाणिस्तानने ५९ धावांनी विजय मि ळवला होता.

# यजमान श्रीलंकेचा आयर्लडवर अडखळत विजय; तीक्षणा–हासारंगाने यांनी राखली इभ्रत


दिल्ली–श्रीलंका संघाने घरच्या मैदानावर आयर्लडचा पराभव करत टी–२० विश्वचषकातील पहिला सामना जिंकला आहे. आयर्लड संघाने कमालीची गोलंदाजी करत श्रीलंकेच्या तोंडचं पाणी पळवलं. पण अखेरच्या षटकांमध्ये कामिंदू मेंडिस व कुसल मेंडिस यांच्या फटकेबाजीमुळे आणि आयर्लडने सोडलेल्या कॅचेसमुळे सामना फिरला. तर दुसऱ्या डावात वानिंदू हसरंगा महिश तीक्ष्णा यांच्या गोलंदाजीमुळे श्रीलंका संघाची घरच्या मैदानावर इभ्रत राखली आणि श्रीलंकेने आयर्लडला सर्वबाद करत शानदार विजय मिळवला.

आयसीसी टी२० विश्वचषक २०२६ चा सहा- वा सामना श्रीलंका आणि आयर्लड यांच्यात कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळवण्यात आला. आयर्लडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यजमान श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ गडी गमावून १६३ धावा केल्या. प्रत्युत्तरात, आयर्लडने २० षटकांत सर्व गडी गमावून १४३ धावा केल्या. त्यामुळे संघाला २० धावांनी सामना गमवावा ला- गला. श्रीलंकेने दिलेल्या १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कर्णधार पॉल स्टर्लिंगला क्लीन बोल्ड करत तीक्ष्णाने संघाला चांगली सुरूवात करून दिली. यानंतर अडायर व टेक्टर यांनी ३२ धावांची चांगली भागीदारी रचली. अडायरला हसरंगाने क्लीन बोल्ड करत संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली. यानंतर टेक्टर व टकेर यांनी ४९ धावांची भागीदारी करत संघाचा डाव साव- रला. पण हसरंगाच्या फिरकीने परत कमाल केली. टेक्टर ३४ चेंडूत ४० धावा करत बाद झाला. तर टकेर २१ धावांवर माघारी परतला.

यानंतर श्रीलंकेच्या गोलंदाजांनी आयर्लडच्या खालच्या फलंदाजी फळीवर हल्लाबोल करत झटपट विकेट्स मिळवले. यादरम्यान वानिंदू हसरंगा व म हिश तीक्ष्णा यांनी प्रत्येकी ३–३ विकेट्स घेतल्या. तर मथीशा पथिरानाने २ विकेट्स घेतल्या, तर दुष्मंता चमीरा व दुनिथ वेलाल्गेने १–१ विकेट्स घेतल्या. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेची सुरुवात संथ झाली. पथुम निसांकाने २३ चेंडूत फक्त २४ धावा केल्या. सलामीवीर कामिल मिश्राने ११ चेंडूत १४ धावा जोडल्या आणि बाद झाले. यष्टीरक्षक–फलंदाज कुसल मेंडिसने नाबाद ५६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली,

### बीसीसीआय चा भारतीय खेळाडूंना धक्का,

मुंबई–र्ल्ड कप २०२६ ला सुरुवात झाली असून यात टीम इंडियाचा पहिला सामना यूएसए विरुद्ध पार पडला. ७ फेब्रुवारी रोजी झालेल्या सामन्यात टीम इंडियाच्या खेळाडूंनी यूएसएचा २९ धावांनी पराभव केला. यामुळे वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाची सुरुवात विजयाने झाली. ग्रुप ए मधील इतर संघांच्या तुलनेत टीम इंडिया हा मजबूत संघ आहे. यंदाचा वर्ल्ड कप भारत आणि श्रीलंका सामन्यांमध्ये खेळवला जातोय. टीम इंडियाच्या खेळाडूंद्वारे त्यांच्या कुटुंबांना या वर्ल्ड कप दरम्यान सोबत ठेवण्याची परवानगी बीसीसीआयकडे मागण्यात आली होती. मीडिया रिपोर्ट्सनुसार भारतीय संघ व्यवस्थापनाने क्रिकेटपटूंच्या कुटुंबियांना त्यांच्यासोबत राहण्यास परवानगी देण्याबाबत स्पष्टता मागितली होती.



# बीसीसीआय ने बहिष्काराच्या वादावर मौन सोडले

**म्हणाले बरे झाले पाकिस्तान सामना खेळायला तयार झाले नाहीतर...**

मुंबई–आयसीसी टी२० वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानने यापूर्वी भारतासोबत नियोजित अस- लेला १५ फेब्रुवारीचा सामना खेळण्यास नकार दिला होता. म ात्र अखेर सोमवारी ९ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानने आयसीसी सोबत झालेल्या बैठकीनंतर त्यांचा भारताविरुद्ध सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय मागे घेतला. यानिर्णयानंतर आता मंगळवारी बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यात राजीव शुक्ला (ींरग्न एप्ल्ज्ञत) यांनी पाकिस्तानशी सकारात्मक चर्चा केल्याबद्दल आयसीसीचे आभार मानले आहेत.

आयसीसीने यात मध्यस्थी केली :

बांगलादेशचे टी२० वर्ल्ड कप सामने हे भारतात नियोजित असताना बांगलादेश स्पर्धे च्या तोंडावर त्यांचे साम ने हे श्रीलंकेत आयोजित करण्याची मागणी करत होती. मात्र याला आयसीसीने नकार दिला आणि बांगलादेशला स्पर्धे बाहेर करून त्या ऐ- वजी स्कॉटलंडला संधी दिली. त्यानंतर बांगलादेशवर अन्याय झाल्याच्या भावनेने पाकिस्तानने या वादात उडी घेतली आणि बांगलादेशची बाजू घेऊन त्यांनी भारताविरुद्ध १५ फेब्रुवारी रोजी होणारा ग्रुप स्टेज सामना खेळण्यासाठी पाकिस्तानचा संघ मैदानात उतरणार नाही असं सांगितलं. मात्र आयसीसीने यात मध्यस्थी घेतली आणि रविवारी आयसीसीकडीं दोन प्रतिनिधींची टीम लाहोरच्या गद्दाफी स्टेडियममध्ये पीसीबीचे प्रमुख प्रमुख मोहसिन नकवी आणि बीसीबीचे प्रमुख अमीनुल इस्लाम यांना भेटले.

आयसीसीकडे काही मागण्या करण्यात आल्या असताना, आयसीसीने बांगलादेशला कोणत्याही निर्बधांना सामोरे जावे लागणार नाही आणि २०३१ पूर्वी आयसीसी स्पर्धेचे आयोजन करण्याचा अधिकार कायम ठेवेल याची पुष्टी केल्यानंतर पाकिस्तान सरकारने औपचारिकपणे आपला निर्णय जाहीर केला.

काय म्हणाले राजीव शुक्ला?

मंगळवारच्या सकाळी बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्लाने पत्रकारांना संबोधित केले आणि आयसीसीने या संदर्भात केलेल्या नेतृत्व क्षम तेला धन्यवाद दिले.

शुक्लाने म्हटले की, 'आयसीसी प्रतिनिधीने सुरू केलेल्या चर्चे च्या निकालांमुळे आणि आयसीसीचे उपाध्यक्ष आणि प्रतिनिधींनी लाहोरला जाऊन पाकिस्तान क्रिकेट बोर्ड आणि बांगलादेश क्रिकेट बोर्डाशी ज्या पद्धतीने चर्चा केली त्याबद्दल मला खूप आनंद झाला आहे. क्रिकेटचे महत्त्व प्राधान्य देण्यासाठी एक चांगला आणि मैत्रीपूर्ण उपाय सापडला आहे'. त्यांनी पुढे म्हटले की, 'आयसीसीने जे केले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. त्यांनी पुढाकार घेतला, समस्या सोडवली आणि क्रिकेटला पुन्हा आघाडीवर आणले. आयसीसीसाठी ही एक मोठी कामगिरी आहे. पाकिस्तानला चर्चेसाठी तयार केल्याबद्दल मी आयसीसीचे आभार म ानू इच्छितो आणि अखेर पाकिस्तानने कोलंबोमध्ये सामना

# टी-२० विश्वचषक: न्यूझीलंडच्या सेफर्ट-एलनने इतिहास घडवला!

नवी दिल्ली: न्यूझीलंड संघाचे सलाम ीवीर फिन एलन व टीम सेफर्ट यांनी संघाला दणदणीत विजय मिळवून देत इतिहास घडवला.

टी–२० विश्वचषक २०२६ मधील ११ वा सामना न्यूझीलंड आणि यूएई यांच्यात खेळवला गेला. १७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना किवींनी यूएईचा १० विकेट्सने दणदणीत पराभव केला. यासह, किवी संघाने या विश्वचषकात सलग दुसरा विजय नोंदवला. न्यूझीलंडचे सलामीवीर फिन एलन आणि टिम सेफर्ट यांनी पहिल्या विकेटसाठी १७५ धावांची भागीदारी केली. या भागीदारीसह, किवी संघाच्या सलामीच्या फलंदाजांनी मिळून एक नवा इतिहास घडवला आहे.

युएईने प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडच्या गोलंदाजीविरूद्ध कम ालीची फलंदाजी केली. युएईने १७२ धावांची धावसंख्या उभारली. या सामन्यात संघाचा कर्णधार मोहम्मद वसीमने अर्धशतकी खेळी साकारली. पण गोलंदाजीत मात्र युएईचा संघ चांगली कामगिरी करू शकला नाही. त्यामुळे न्यूझीलंड संघाने सहज विजय मिळवला.

१७५ धावांची ही भागीदारी

टी–२० विश्वचषकात कोणत्याही विकेटसाठीची सर्वोच्च भागीद- ारी आहे. यासह सेफर्ट आणि फिन एलन यांनी टी–२० विश्वचषकाच्या इतिहासातील मागील सर्व भागीद- ारी विक्रम मोडले. आतापर्यंत, टी–२० विश्वचषकाच्या इतिहासात कोणत्याही विकेटसाठी सर्वात मोठी भागीदारी करण्याचा विक्रम जोस बटलर आणि एलेक्स हेल्स यांच्या नावावर होता. २०२२ च्या टी- २० विश्वचषक उपांत्य सामन्यात भारताविरुद्ध या दोघांनी नाबाद १७० धावांची सलामी भागीदारी केली होती. दक्षिण आफ्रिकेचे क्विंटन डी कॉक आणि रिली रुसो यादीत तिसऱ्या क्रमांकवर आहेत, ज्यांनी २०२२ च्या टी–२० विश्वचषकात बांगलादेशविरुद्ध १६८ धावांची भागीदारी केली होती. श्रीलंकेचा म हेला जयवर्धने आणि कुमार संगकारा आता या यादीत चौथ्या क्रमांकावर गेले आहेत. २०१० च्या टी–२० विश्वचषकात वेस्ट इंडिजविरुद्ध त्यांनी दुसऱ्या विकेटसाठी १६६ धावांची भागीदारी केली होती. २०२४ च्या टी–२० विश्वचषकात युगांडाविरुद्ध १५४ धावांची भागीदारी करणारे अफगाणिस्तानचे रहमानुल्लाह गुरबाज आणि इब्राहिम झाद्रान पाचव्या क्रमांकावर आहेत.

हेही वाचा

न्यूझीलंडचा ढ२०थउमध्ये ऐतिहासिक विजय! युएईविरूद्ध एकही विकेट न गमावता विजयाची नोंद; सेफर्ट- एलनची विक्रमी भागीदारी

टी–२० विश्वचषकात सर्वात मोठी भागीदारी रचणारी जोडी

टीम सेफर्ट–फिन एलन – १७५* धावा वि. युएई, २०२६

जोस बटलर–एलेक्स हेल्स – १७० धावा वि. भारत, २०२२

क्विंटन डीकॉक–राईली रूसो – १६८ धावा वि. बांगलादेश

महेला जयवर्धने–कुमार संगकारा – १६६ धावा वि. वेस्ट इंडिज

रहमानुल्ला गुरबाज–इब्राहिम झादरान – १५४ धावा वि. युगांडा



# सोलापूर-सीएसएमटी मुंबई वंदे भारत एक्सप्रेसची ३ री वर्षपुर्ती

## १०२.२७% ऑक्युपन्सी सोबत जवळपास २३ लाखांहून अधिक प्रवाशांनी केला आरामदायी प्रवास

**सोलापूर/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) मुंबई वंदे भारत एक्सप्रेसने १० फेब्रुवारी २०२६ रोजी आपल्या समर्पित सेवेची तीन वर्षे यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत, जी आधुनिक रेल्वे कनेक्टिव्हिटी आणि प्रवाशांच्या सोयीसुविधांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा आहे.

९ फेब्रुवारी २०२३ रोजी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून या सेवेचे उद्घाटन करण्यात आले. भारताची अर्थिक राजधानी मुंबई तसेच कापड आणि हुतात्म्यांचे शहर सोलापूर यांच्यात जलद आणि जागतिक दर्जाची रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली ही देशातील ९ वी वंदे भारत एक्सप्रेस होती.

आर्थिक आणि सामाजिक संबंध मजबूत करण्यासोबतच, या ट्रेनने धार्मिक आणि पर्यटन कनेक्टिव्हिटीमध्ये लक्षणीय वाढ केली आहे, ज्यामुळे सिद्धेश्वर मंदिर (सोलापूर) तसेच सोलापूरजवळील अक्कलकोट, तुळजापूर, पंढरपूर आणि पुण्याजवळील आळंदी यासारख्या महत्त्वाच्या तीर्थस्थळांना जोडले गेले आहे. सुरू झाल्यापासून, ही ट्रेन दररोज प्रवास करणारे, विद्यार्थी, व्यावसायिक प्रवासी, पर्यटक आणि यात्रेकरूंमध्ये पसंतीची निवड म्हणून उदयास आली आहे, जी तिची वाढती लोकप्रियता आणि विश्वासार्हता दर्शवते.

ट्रेन क्रमांक २२२२६/२२२२५ सोलापूर-सीएसएमटी मुंबई वंदे भारत एक्सप्रेस ४५५ किमी अंतर फक्त ६ तास ३० मिनिटांत पूर्ण करते, तर सध्याच्या सुपरफास्ट सेवांमध्ये ७ तास ५५ मिनिटांत पूर्ण होते, ज्यामुळे प्रवासाच्या वेळेत अंदाजे १ तास ३० मिनिटांची बचत होते. सध्या,





ही ट्रेन आठवड्यातून सहा दिवस धावते आणि कुर्डुवाडी, दौंड, पुणे, कल्याण, ठाणे आणि दादर येथे थांबते.

सुरुवातीला १६ डब्यांच्या वंदे भारत ट्रेन सेटसह सुरू करण्यात आलेल्या या सेवेला प्रवाशांची प्रचंड मागणी होती, ज्यामुळे ऑगस्ट २०२५ मध्ये ही सेवा २० डब्यांच्या रेकपर्यंत वाढवण्यात आली. सध्या, ट्रेनमध्ये एकूण १,४४० आसन क्षमता आहे, ज्यामध्ये १,३३६ चेअर कार (सीसी) सीट्स आणि १०४ एक्झिक्युटिव्ह चेअर कार (ईसी) सीट्स आहेत. ट्रेनची प्रचंड लोकप्रियता तिच्या उल्लेखनीय कामगिरीतून दिसून येते, जानेवारी २०२६ पर्यंत एकूण १०२.२७% ऑक्युपन्सी सह २३,४३,५९८ प्रवाशांनी प्रवास केला.

सोलापूर-सीएसएमटी मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचे एक उल्लेखनीय तांत्रिक वैशिष्ट्य म्हणजे आधुनिक पुश-अँड-पुल तंत्रज्ञानाचा वापर, ज्यामुळे बँकर लोकोमोटिव्हशिवाय सहजतेने प्रवास करता येतो. ही ट्रेन आव्हानात्मक भोरं घाट (कर्जत-लोणावळा-खंडाळा) विभागातून एकाच दिवसांत सुमारे दोन वेळा तीच्या कार्यक्षमतेने चढते आणि उतरते, ज्यामध्ये समांतर आंतरात प्रत्येकी ३७ मीटर पैकी १ मीटर हा सर्वात तीव्र ग्रेडियंट आहे. यामुळे भारतीय रेल्वेच्या प्रगत अभियांत्रिकी क्षमतांचे प्रगती दिसून येते.

सोलापूर-सीएसएमटी मुंबई वंदे भारत एक्सप्रेसच्या तीन यशस्वी वर्षांच्या सेवेची पूर्तता ही भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरण, प्रवाशांच्या सोयी, वेग, सुरक्षितता आणि शाश्वत वाहतुकीच्या प्रतिबद्धतेचा पुरावा आहे, त्याचबरोबर प्रादेशिक विकास आणि राष्ट्रीय कनेक्टिव्हिटीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

## जेएसपीएम लातूर संस्थेच्या संभाजीनगर येथील अराईज स्कूलमधील राष्ट्रभक्त स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्याचे सोमवारी अनावरण

**लातूर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर येथील सिडको एन-९, बळीराम पाटील शाळेजवळील अराईज इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व



राष्ट्रभक्त स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त जी.श्रीकांत यांच्या शुभहस्ते १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ०६ वाजता करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी, जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांची उपस्थित राहणार आहे तर प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या उपाध्यक्ष अपर्णा थेटे, जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, एमआयईपीए चे संचालक प्रकाश मुकुंद, छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभागाचे उपसंचालक कैलास दातखिळे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अनिल जैस्वाल व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे संचालक सतीश सातव आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला छत्रपती संभाजीनगर येथील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जेएपीएम संस्थेचे कार्यकारी संचालक रंजित पाटील कव्हेकर, अराईज इंटरनॅशलन स्कूलचे प्राचार्य प्रशांत जोशी आदींनी केले आहे.

## लातुरात कामगारांचा गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार विराट मोर्चा

### मोर्चात सहभागी होण्याचे कामगार नेते राजकुमार होळीकर यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रातील मोदी सरकारने कामगारांचे हक्क आणि अधिकार असलेले २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे केलेत. हे नवीन चार कायदे कामगारांना व कर्मचाऱ्यांना गुलाम बनवणारे असल्याने ते त्वरित परत घ्यावेत. या व अन्य विविध मागण्यासाठी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी चौक लातूर येथे विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात लातूर जिल्ह्यातील कष्टकरी, श्रमिक व कामगार बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

मोदी सरकारने कामगारांच्या हिताचे तब्बल २९ कायदे रद्द करून चार नवीन कायदे केले आहेत. त्यामुळे कामगार वर्गाचे मोठे नुकसान होणार आहे. कामगारांची पिळवणूक करून



त्यांना उध्वस्त करण्याचा डाव भाजप सरकारचा आहे. घरेलू कामगार, बांधकाम कामगार, माथाडी कामगार, कंत्राटी कामगार यांच्या हक्क आणि अधिकारांचे रद्द केलेले २९ कामगार कायदे पुन्हा प्रस्थापित करून त्याची अंमलबजावणी करा, कामाच्या तासांत वाढ करू नका, कायम स्वरूपी बारमाही कामामध्ये कंत्राटी कामगार पद्धत बंद करा. सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उद्योग, सेवा उद्योग, नगरपालिका, महानगर पालीका अशा ठिकाणी अस्थाई वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटी, हंगामी, रोजदारी, मानधनावरील कामगाराना/कर्मचाऱ्यांना विनाअट कायम करा. लोकशाही व स्वातंत्र्य हिरावून घेणारा महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा रद्द करा, नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्याना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सहाय्य योजनेत कोणताही बदल न करता त्या पूर्ववत चालू ठेवावे आदी मागण्यासाठी गुरुवारी १२ फेबुवारी सकाळी ११-३० वाजता लातूर शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथून जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर कामगारांचा विराट मोर्चा धडकणार आहे. कामगार, कष्टकरी, श्रमिकांनी १२ फेब्रुवारीच्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कामगार नेते राजकुमार होळीकर यांच्यासह संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश काटे, सचिव शिवाजी भंडारे, इंजि. शफी शेख, लातूर तालुकाद्यक्ष अंकुश टकळगे, शहर सचिव महेंद्र कांबळे, प्रमोद बानाटे, बळीराम कांबळे, किशोर सगर, मंगळताई शिंदे, नूतन अंगरखे, अनिता काकरे, चंद्रपाल गिरी, भागवत पांचाळ आदींनी केले आहे.

## मुक्त विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांसाठी 'बोली भाषा लेखन स्पर्धा' आयोजित

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि संवाद पत्रिकेच्या वतीने विद्यापीठातील सर्व अध्ययनार्थींसाठी मराठी 'बोली भाषा लेखन स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा, संजीव सोनवणे यांच्या निर्देशानुसार मराठी भाषा पंधरवडा निमित्त आयोजित या स्पर्धेत विद्यार्थ्यांना येत्या दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत भाग घेता येईल.

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक प्रदेश - विभागाची आणि गावांची एक विशिष्ट बोली आहे, जिचा प्रभाव आपणास प्रमाणभाषेत बोलतानाही दिसून येतो. प्रामुख्याने अहिराणी, कोकणी, वऱ्हाडी, मालवणी, झाडीबोली, मराठवाडी, कोल्हापुरी, आग्री, वंजारी, चंदगडी, वाडवळी, खान्देशी आदी बोली भाषांचे जतन करण्याच्या हेतूने ही स्पर्धा आहे. त्यासाठी मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या जिल्ह्यातील किंवा प्रदेशातील बोली भाषेतील कथा, कविता, गाणी, लोकगीते,



उखाणे आणि ओव्या इत्यादींचे लेखन पाठवायचे आहे. कथेसाठी ८०० ते १००० शब्दांची मर्यादा असून कविता, गाणी, लोकगीते, लोकनाट्य आणि उखाण्यांसाठी कोणतीही शब्दमर्यादा ठेवण्यात आलेली नाही. स्पर्धकांनी आपले साहित्य स्वतःचे आहे की इतरांचे संग्रहित आहे, याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. साहित्य टंकलिखित किंवा स्वअक्षरात लिहून त्याची पीडीएफ किंवा वर्ड फाईल सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत paikraošvkycmou.digitaluniversity.ac या ईमेल पत्त्यावर पाठवावी. सोबत स्पर्धक विद्यार्थ्याने आपले पूर्ण नाव, शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्राचे नाव, केंद्र संकेतांक आणि कायम नोंदणी क्रमांक (पीआरएन) नमूद करणे बंधनकारक आहे.

# प्रवाशांच्या मागणीनुसार मध्य रेल्वे मुंबई आणि नागपूर/कोल्हापूर/सावंतवाडी रोड तसेच पुणे आणि नागपूर दरम्यान २४ विशेष रेल्वे गाड्या चालवणार आहे

**मुंबई/प्रतिनिधी :** खालील स्थानकांदरम्यान प्रवाशांच्या वाढत्या मागणीमुळे मध्य रेल्वे २४ विशेष रेल्वे गाड्या चालवणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई (सीएसएमटी) आणि नागपूर/ कोल्हापूर/सावंतवाडी रोड व लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) आणि नागपूर तसेच पुणे आणि नागपूर

**तपशील खालीलप्रमाणे आहेत:**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - कोल्हापूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष- (६ सेवा)

**ट्रेन क्रमांक ०१०२९** विशेष १३.०२.२०२६, १८.०२.२०२६ आणि २०.०२.२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून दुपारी १४.३० वाजता सुटेल आणि श्री छत्रपती शाहू महाराज टर्मिनस, कोल्हापूर येथे दुसऱ्या दिवशी ०४.२० वाजता पोहोचेल.

**ट्रेन क्रमांक ०१०३०** विशेष १४.०२.२०२६, १९.०२.२०२६ आणि २१.०२.२०२६ रोजी श्री छत्रपती शाहू महाराज टर्मिनस, कोल्हापूर येथून दुपारी १५.५५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसर्या दिवशी ०४.०५ वाजता पोहोचेल.

**थांबे :** दादर, ठाणे (फक्त ०१०३० साठी), कल्याण, लोणावळा, पुणे, जेजुरी, लोणंद, सातारा, कराड, किर्लोस्करवाडी, सांगली आणि मिरज.

**संरचना :** ४ वातानुकूलित तृतीय, ८ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-** सावंतवाडी रोड - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष- (६ सेवा)

**ट्रेन क्रमांक ०११२९** विशेष दि. १४.०२.२०२६, १९.०२.२०२६ आणि २१.०२.२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल आणि सावंतवाडी रोड येथे त्याच दिवशी १२.३० वाजता पोहोचेल.

**ट्रेन क्रमांक ०११३०** विशेष १४.०२.२०२६, १९.०२.२०२६ आणि २१.०२.२०२६ रोजी सावंतवाडी रोड येथून १७.२० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०४.०५ वाजता पोहोचेल.

**थांबे :** दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्र्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ.

**संरचना :** १ वातानुकूलित द्वितीय, ५ वातानुकूलित तृतीय, १० शयनयान, ४ सामान्य आणि २ द्वितीय सामान्य श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस -** नागपूर- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सुपरफास्ट विशेष- (२ सेवा)

**ट्रेन क्रमांक ०२१३९** सुपरफास्ट विशेष १९.०२.२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल.

**ट्रेन क्रमांक ०२१४०** सुपरफास्ट विशेष १७.०२.२०२६ रोजी नागपूर येथून २०.०० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १३.३० वाजता पोहोचेल.

**थांबे :** दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिकरोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा.

**संरचना :** १ वातानुकूलित द्वितीय, ५ वातानुकूलित तृतीय, १० शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि १ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

लोकमान्य टिळक टर्मिनस - नागपूर- लोकमान्य टिळक टर्मिनस विशेष - (४ सेवा)

**ट्रेन क्रमांक ०१०२१** सुपरफास्ट विशेष १४.०२.२०२६ आणि २१.०२.२०२६ रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ००.५५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.४५ वाजता पोहोचेल.

**ट्रेन क्रमांक ०१०२२** विशेष दि. १४.०२.२०२६ आणि २१.०२.२०२६ रोजी नागपूर येथून २०.०० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ११.४५ वाजता पोहोचेल.

**थांबे :** ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा.

**संरचना :** १ वातानुकूलित द्वितीय, ६ वातानुकूलित तृतीय, ९ शयनयान, ४ सामान्य द्वितीय, १ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि १ जनररेटर व्हॅन.

**पुणे - नागपूर - पुणे सुपरफास्ट विशेष - (४ सेवा)**

**ट्रेन क्रमांक ०१४६७** सुपरफास्ट विशेष १३.०२.२०२६ आणि २०.०२.२०२६ रोजी पुणे येथून दुपारी ३.५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता पोहोचेल.

**ट्रेन क्रमांक ०१४६८** सुपरफास्ट विशेष दि. १४.०२.२०२६ आणि २१.०२.२०२६ रोजी नागपूर येथून सकाळी ०८.०० वाजता सुटेल आणि पुणे येथे त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता पोहोचेल.

**संरचना :** २ वातानुकूलित द्वितीय, ४ वातानुकूलित तृतीय, ८ शयनयान, ४ सामान्य द्वितीय, १ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर व्हॅन.

**पुणे - नागपूर - पुणे सुपरफास्ट विशेष - (२ सेवा)**

**ट्रेन क्रमांक ०१४१९** सुपरफास्ट विशेष १८.०२.२०२६ रोजी पुणे येथून दुपारी ३.५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ०६.३० वाजता पोहोचेल.

**ट्रेन क्रमांक ०१४२०** सुपरफास्ट विशेष १९.०२.२०२६ रोजी नागपूर येथून सकाळी ०८.०० वाजता सुटेल आणि पुणे येथे त्याच दिवशी रात्री २३.३० वाजता पोहोचेल.

**संरचना :** १ प्रथम वातानुकूलित, १ वातानुकूलित द्वितीय, २ वातानुकूलित तृतीय, ५ शयनयान, ६ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन.

०१४६७/०१४६८ आणि ०१४१९/०१४२० साठी थांबे :- उरुळी, दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा.

**आरक्षण:** गाडी क्रमांक ०१०२९, ०१०३०, ०११२९, ०२१३९, ०२१४०, ०१०२१, ०१०२२, ०१४६७, ०१४६८, ०१४१९ आणि ०१४२० चे बुकिंग सर्व पीआरएस स्थानकांवर आणि आयआरसीटीसी वेबसाइट (www.irctc.co.in) वर खुले आहे.

अनारक्षित डब्यांसाठी सामान्य शुल्कासह बुकिंग यूटीएस द्वारे करता येते.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रक जाणून घेण्यासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट

## सरस्वती महाविद्यालयात संगीत अभ्यास मंडळाचे शानदार उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील संगीत विभागाच्या वतीने '' संगीत अभ्यास मंडळाचे उद्घाटन '' भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद गायक उस्ताद अफजल हुसैन साहेब यांच्या शुभहस्ते दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालमणी डॉ.राम बोरगावकर, उद्घाटक भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद गायक उस्ताद अफजल हुसैन साहेब, प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध मृदंग वादक श्री. गोपाळ जाधव, प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग गोरे,संगीत विभाग प्रमुख प्रा.अमोल जाधव उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगीत विभाग प्रमुख प्रा.अमोल जाधव यांनी केले. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून भोपाळ येथील सुप्रसिद्ध ध्रुपद गायक उस्ताद अफजल हुसैन साहेब यांच्या शुभहस्ते संगीत अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात संगीत विभागातील सर्व सदस्यांना शुभेच्छा देऊन




वर्षभरातील संगीत विभागातील कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये अभ्यास मंडळाचा सहभाग व त्याचे कार्य यावर विस्तृत असे भाष्य केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ. राम बोरगावकर म्हणाले की, महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक आणि सार्वभौमिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे कार्य अभ्यास मंडळाच्या माध्यमातून व्हावे, विद्यार्थ्यांमध्ये बहुआयामी नेतृत्व गुण तयार व्हावे तसेच अभ्यास मंडळाच्या माध्यमातून वेगवेगळ्या संगीत स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात असे मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीमंत दोरवे यांनी केले तर उपस्थितांचे आभार संगीत विभागातील प्रा.अमोल जाधव यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# जि. प.- पं.स. सदस्यांना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी दिल्या शुभेच्छा

## आशियाना बंगल्यावर जिल्ह्यातील नवनिर्वाचित जी.प.पंचायत समिती सदस्य पदाधिकाऱ्यांची मोठी गर्दी



**लातूर/प्रतिनिधी:** नुकत्याच झालेल्या लातूर जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने दमदार विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून जिल्हा परिषदमध्ये ठरलेला असून जिल्ह्यातील सर्व नूतन जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी आशियाना निवासस्थानी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले त्यावेळी दिलीपराव देशमुख यांनी सर्व नूतन सदस्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या व जिल्ह्यातील सर्व मतदार कार्यकर्ते पदाधिकारी यांचे आभार व्यक्त केले दरम्यान सकाळपासून आशियाना बंगल्यावर जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते नवनिर्वाचित सदस्यांनी आनंद साजरा करत आशियाना निवासस्थान गर्दीने खचाखच भरलेले दिसत होते यावेळी माजी आमदार जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख, माजी आमदार तथा विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष वैजनाथ शिंदे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके, मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे,जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख,रेणा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अँड प्रवीण पाटील, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले, नूतन जिल्हा परिषद सदस्या सौ आशाताई भिसे, सौ अश्विनी शिंदे,सौ भागीरथी पाटील, सौ मनीषा कदम, सौ दीपाली भोसले, सौ दिपाली आदमाने, सौ रुपाली वाघमारे, सौ नागेश्वरी केंद्रे शांताबाई अदावले,जिल्हा परिषद सदस्य महादेव मस्के, बाळू (श्रीकांत) माने, दत्तात्रय टेकाळे पंचायत समिती सदस्य सत्यनारायण पाटील,बाळासाहेब कदम, अक्षय देशमुख, महेश चव्हाण विलास उपाडे सौ शरयू गायकवाड सौ शिवानी शिंदे, पूजा जाधव सौ दिपाली कराड उद्धव जाधव बालाजी गोटके, सौ मिरा सूर्यवंशी राजेश केंद्रे, श्रीकांत बैले, यांच्यासह जळकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष मारुती पांडे, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे,रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक सर्जेराव मोरे,जिल्हा बँकेचे संचालक राजकुमार पाटील सचिन पाटील रवींद्र काळे सचिन दाताळ हरिराम कुलकर्णी, शिवाजी कांबळे, दयानंद बिडवे श्रीकृष्ण काळे सुरेश चव्हाण, बाबुराव जाधव,दत्ता शिंदे, सचिन शिंदे, बचाटे,अमोल भिसे संभाजी रेड्डी गणपतराव बाजुळगे, मकबूल वलांडीकर, चांदपशा इनामदार प्राध्यापक शशिकांत कदम, यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे हिरक महोत्सवी अधिवेशन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे हिरक महोत्सवी,कोकण विभाग ग्रंथालय संघाचे २७ वे आणि रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे ४९ वे अधिवेशन दि.२१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ आणि स्व.आम.कुसुमताई अभ्यंकर ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी समर्थ मंगल कार्यालय,साळवी स्टॉप.ता.जि.रत्नागिरी येथे आयोजित केले असून,या तिहेरी अधिवेशनाचे उदघाटन राज्याचे उद्योग मंत्री पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते दि.२१ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता होणार आहे.



सदर संयुक्त अधिवेशनाच्या निमित्ताने दि.२१ फेब्रुवारी २६ रोजी सकाळी ८.३० वाजता नवलाई देवी मंदीर ते अधिवेशन स्थळ दरम्यान ग्रंथदिंडी निघणार आहे. त्यानंतर १० वाजता राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशनाचे उद्धाटन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी महसूल व गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.स्वागताध्यक्ष उद्योजक दीपकशेठ गद्रे असून, साहित्यिक कृष्णाजी कुलकर्णी व ग्रंथसखा विश्वस्त श्याम जोशी हे मार्गदर्शन होणार आहे.यावेळी राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, कोकण विभागाचे सहा.ग्रंथालय संचालक प्रशांत पाटील,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, प्रमुख कार्यवाह सोपानराव पवार, कार्योपाध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले, कोषाध्यक्ष भिमराव पाटील, कोकण विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष दिलीप कोरे,स्थाई समिती सचिव सुनील कुबल, ग्रंथालय कर्मचारी प्रतिनिधी ग्रंथमित्र नंदू बनसोड यांची मंचावर उपस्थिती लाभणार आहे.या सत्राचे प्रास्ताविक रवींद्रकुमार तथा भाई कालेकर हे करणार असून, सूत्रसंचालन अंजली बर्वे व श्रीकांत पाटील हे करतील.

दुपारी १२.३० ते २ या दरम्यान पुरस्कार प्रदान आणि सार्वजनिक ग्रंथालयाची आत्मनिर्भरता या विषयावरचा पहिला परिसंवाद दिलीप कोरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यात ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष चांगदेव काळे,ग्रंथ निवड समितीचे माजी सदस्य ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, नईस खान पठाण नाशिक, अंजली बर्वे रत्नागिरी व अरविंद कुलकर्णी देवरुख हे विचार मांडणार आहेत.

दुपारी ३ ते ४ या वेळात मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र खंडेराव सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक ग्रंथालयाचे संगणकीकरण आणि डिजिटलायझेशन या विषयावर होणार्या परिसंवादात भगवान घेरडे, मनिषा सावंत, संतोष चतुर्भूज हे मार्गदर्शन करणार आहेत.

दुपारी ४ ते सायंकाळी ५ दरम्यान अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालयांनी अनुदानाव्यतिरीक्त उत्पादनाची साधने कशी वाढवावीत? या विषयावर चर्चा सत्र होईल. सायंकाळी ५.३० ते ७ या वेळात महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, कोकण विभाग ग्रंथालय संघ आणि रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाची सर्वसाधारण सभा होणार आहे.रात्री ७ ते ९ या वेळात गायक गुरुदेव नांदगावकर आणि सहकलाकारांचा अभिजात मराठी भावगीतांचा गंध फुलांचा हा सुमधूर कार्यक्रम आयोजिला आहे.

रविवार,दि.२२ फेब्रुवारी नाशिक विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष दत्ता परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरीतील शताब्दी ग्रंथालये या विषयावर परिसंवाद होणार आहे.यामध्ये दिपक पटवर्धन,मधुरा जोशी, अरुण इंगवले,गजानन जोशी,जयंत अभ्यंकर हे विचार व्यक्त करणार असून, समारोप रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष संभाजी सावंत हे करणार आहेत.

सकाळी ११ ते १ या वेळामध्ये नागपूर विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष शिवकुमार शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय चळवळीचा मुळाधार- ग्रंथालय सेवक या विषयावर होणार्या परिसंवादात सिंधुदुर्ग जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्य संजय शिंदे, रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक राकेश आंबेकर, कोलगाव मुक्तद्वार ग्रंथालयाचे ग्रंथपाल पूनम नाईक हे विचार व्यक्त करणार आहेत.

दुपारी १ ते ३ दरम्यान या अधिवेशनाचे खुले व समारोप सत्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून,यावेळी राज्य ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर,सर्व विभागाचे सहा.ग्रंथाल संचालक अनुक्रमे प्रशांत पाटील,शालिनी इंगोले,डॉ.राजेश पाटील,रामदास साठे, सुनील हुसे,स.र.जोपुळे,रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशांक नाईक, ग्रंथालय निरीक्षक हेमंत काळोखे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे.

तेव्हा लातूर जिल्ह्यातील ग्रंथालय चालक,ग्रंथालय कर्मचारी व ग्रंथप्रेमींनी या तिहेरी अधिवेशनाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून ग्रंथालय चळवळी वृध्दींगत करावे असे आवाहन राज्य ग्रंथालय संघाचे राज्या कार्योपाध्यक्ष राम मेकले, लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर, जिल्हा उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, सहकार्यवार काशिनाथ बोडके, संचालक सर्वश्री हावगी बेरकीळे, सूर्यकांत शिरसे, किरण बाबळसूरे, अशोक खोडवे,श्रीधर स्वामी, जहांगीर सय्यद, नंदकुमार घोगरे, अनिल पाटील,गुप्तलिंग स्वामी, संतोष करमले,काशिनाथ साहू, बाळकृष्ण होळीकर, तुकाराम सुगावकर, बालाजी सूर्यवंशी,गोकर्णा सूर्यवंशी, राजकुमार सोनी, नागनाथ बिरादार, डॉ.अमित म्हेत्रे व रामचंद्र तिरके यांनी केले आहे.

# लातूरच्या आयडीए' शाखेला ५ राष्ट्रीय पुरस्कार:इंडियन डेंटल कॉन्फरन्स''मध्ये हे पुरस्कार प्रदान, स्थानिक दंतवैद्यांची राष्ट्रीय स्तरावर मोहोर



**लातूर/प्रतिनिधी:**आरोग्य सेवेचे केंद्र असलेल्या लातूर शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. इंडियन डेंटल असोसिएशनच्या (आयडीए) लातूर शाखेने २०२४-२५ या वर्षात राबवलेल्या उत्कृष्ट सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची दखल घेत राष्ट्रीय स्तरावर पाच पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. कर्नाटक मधील मंगलोर येथे आयोजित ७६ व्या ''इंडियन डेंटल कॉन्फरन्स''मध्ये हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

लातूर शाखेने वर्षभरात दंत आरोग्याबाबत जनजागृती करताना १९ सामाजिक उपक्रम आणि ५ महत्त्वपूर्ण ''सीडीई'' कार्यक्रम यशस्वीपणे राबविले. विशेष म्हणजे, विभागस्तरीय डेंटल कॉन्फरन्सच्या माध्यमातून ३०० हून अधिक दंत वैद्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. या गौरवशाली यशाने लातूरच्या आरोग्य क्षेत्राचे नाव देशात झळकले आहे. केवळ उपचार करणे एवढेच आमचे ध्येय नसून, समाजाला दंत व्याधीमुक्त करणे ही आमची जबाबदारी आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या यशाबद्दल लातूरमधील वैद्यकीय क्षेत्रातून कौतुक होत आहे. इंडियन डेंटल असोसिएशन लातूर शाखेच्या वतीने सामाजिक जाणिवेतून उपक्रम राबवण्यात येतात. या सामाजिक कार्याची पावती म्हणून राष्ट्रीय पातळीवर लातूरचा व लातूर दंत शाखेचा गौरव झाला. हे दैदिप्यमान यश व ऐतिहासिक कामगीरी हे सर्वांचे मनोबल वाढवणारा तसेच सामाजिक कार्य आणखी जोमाने करण्यासाठी प्रेरणादायी आहे. - डॉ. शैलेश पडगीलवार, सचिव, इंडियन डेंटल असोसिएशन, लातूर शाखा. १) देशातील उत्कृष्ट डेंटल असोसिएशन शाखा ( उपविजेता लातूर शाखा) २) उत्कृष्ट डेंटल असोसिएशन अध्यक्ष - (उपविजेता डॉ शिल्पा लटुरीया) ३) उत्कृष्ट डेंटल असोसिएशन सचिव ( उपविजेता डॉ. शैलेश पडगीलवार) ४) उत्कृष्ट सीडीई समन्वयक (उपविजेता- डॉ. आनंद अंबेकर) ५) उत्कृष्ट सीडीएच समन्वयक (उपविजेता- डॉ. नीलम पन्हाळे)

## विरोधी ..

विरोधी बाकांवरती
भक्कम नेतृत्व हवे
प्रदूषण नियंत्रणार्थ
निर्जन्तुक करा हवे

उधळू नये गजराज
अंकुशा कायम ठेवे
आचारसंहिताखास
पायंडा पडणार नवे

उन्मत्त न होई सत्ता
शिस्तीत पक्षांचेथवे
महत्वाचे दोन्हीहात
असो उजवे वा डावे

सकारात्मककार्यांत
बा सत्ते सोबत यावे
जनकल्याणप्रकल्प
नक्की तडीस न्यावे

अकारण अ वास्तव
कशा स्तव हेवे दावे
चुकीचे कुठे घडता
हिसका वेळीचं दावे

सत्ता धारी विरोधक
सेवा करो मनोभावे
लोकशाही सुलक्षण
विलक्षण दोन्हीनावे

यंत्रणाविशिष्ट अशी
जन सामान्यांचे सेवे
रे प्रगतिगति देशाची
धावावे एकमेकांसवे

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# नवीन तंत्रज्ञानानुसार सर्वांना स्वत:ला बदलावे लागेल : डॉ.बी. एस.सुरवसे

**उदगीर/प्रतिनिधी:** संशोधन हे जर्नलचा इनफॅक्ट किती आहे यानुसार न ठरता ते किती अभ्यासपूर्वक केलेले आहे यानुसार ठरते. आहे त्यापेक्षा एखाद्या अडचणीवर मार्ग काढणारे संशोधन हे यशस्वी ठरते. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानानुसार संशोधनात सर्वांना बदलावे लागेल असे उद्गार जैवशास्त्र संकुलाचे संचालक डॉ.बी.एस.सुरवसे यांनी काढले. छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात विज्ञान शाखेने आयोजित केलेल्या मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनातील उदयोन्मुख कल या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी.टी.शिंदे होते. तर प्रमुख उपस्थिती कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, कार्यकारणी सदस्य रामराव एकंबे ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एम.मांजरे, सिनेट सदस्य डॉ.विष्णू पवार यांची होती.पुढे बोलताना डॉ.सुरवसे म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणानुसार संशोधनाचा वापर होणे गरजेचे आहे. व्यावसायाभिमुख शिक्षणाला महत्त्व आलेले असल्यामुळे त्यानुसार आपल्याला आपली वाटचाल करावी लागेल असेही त्यांनी म्हटले.अध्यक्षीय समारोप अध्यक्षांच्या वतीने प्राचार्य डॉ. मांजरे यांनी करताना म्हटले, विविध विषयाने एकत्रित येऊन घेतलेले हे चर्चासत्र संशोधकांच्या व विद्यार्थ्यांच्या संशोधनाला चालना देणारे ठरलेले आहे.भारतभरातून याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला हे आमच्या महाविद्यालयाचे भाग्य समजतो असेही ते म्हणाले. २७० संशोधकांनी या चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला तर १२५ संशोधकांनी पेपर प्रकाशित केले.

# प्रा.डॉ. बालाजी कळंबे यांचे यूजीसी नेट परीक्षेत घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी:** दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथील वाणिज्य व व्यवस्थापन विभागात कार्यरत असलेले प्रा. डॉ. बालाजी कळंबे यांनी मॅनेजमेंट (चरपरसशाशपीं) या विषयातून डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या यूजीसी नेट परीक्षेत ८३.४० पर्सेंटाईल गुण मिळवून प्रथम प्रयत्नात यशस्वीरीत्या उत्तीर्ण होत महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत मानाचा शिरपेच रोवला आहे.



विशेष बाब म्हणजे, १४ वर्षांपूर्वी एम.कॉम.चे विद्यार्थी असतानाच त्यांनी वाणिज्य विषयातून यूजीसी नेट व महाराष्ट्र सेट परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण केल्या होत्या. तब्बल १४ वर्षांनंतर पुन्हा एकदा केवळ आपले विषयज्ञान व अभ्यासाची कसोटी पाहण्यासाठी त्यांनी डिसेंबर २०२५ मध्ये यूजीसी नेट परीक्षा दिली आणि मॅनेजमेंट विषयातूनही प्रथम प्रयत्नात यश संपादन केले, ही बाब त्यांच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक प्रवासाची साक्ष देते. प्रा. डॉ. कळंबे सध्या पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक म्हणून कार्यरत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ५ संशोधन विद्यार्थी पीएच.डी. करत आहेत. संशोधन क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय असून त्यांच्या नावावर ५ राष्ट्रीय व ३ आंतरराष्ट्रीय पेटंट्स नोंदविण्यात आलेली आहेत. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एकूण ३६ संशोधन निबंध (ठशीशरीलह झरशिीी) विविध नामांकित जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांना यापूर्वी राज्यस्तरीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार तसेच धींपस ठशीशरीलहशी -ुरीव ने सन्मानित करण्यात आले आहे. वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील ते प्रख्यात अभ्यासक असून ते भारतीय व्यवस्थापन संस्थान (खखच्) अहमदाबादचे माजी विद्यार्थी (-श्रींर्पीी) आहेत. त्यांनी खखच् अहमदाबाद येथे फॅक्ल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. या यशामुळे वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक म्हणून त्यांची शैक्षणिक ओळख अधिक दृढ झाली आहे. हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यास, संशोधनाभिमुख दृष्टिकोन, शैक्षणिक निष्ठा व आत्मविश्वासाचे फलित असून नवोदित संशोधक व विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, कोषाध्यक्ष संजय बोरा, सदस्य विशाल अग्रवाल, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

**लघु निविदा सूचना**

**निविदा क्र. 1)EE/LTR/TS/NSC/T-01/2026-27.**
**2) EE/LTR/TS/BMHT/T-02/2026-27.**
**3) EE/LTR/TS/BMLT/T-03/2026-27.**
**4) EE/LTR/TS/BMDTC/T-04/2026-27.**

कार्यकारी अभियंता, महावितरण, तर्फे लातूर विभागासाठी अधिकृत व नोंदणी असलेल्या ठेकेदाराकडून खालील कामासाठी निविदा मागविण्यात येत आहे.

**कामाचे स्वरूप:** १) लातूर विभागांतर्गत येणाऱ्या सर्व **Infrastructure development for release of new service connections** करणे बाबत.
२) लातूर विभागांतर्गत येणाऱ्या सर्व **Overhead and Underground HT Line चे Breakdown Maintenance** करणे बाबत.
3) लातूर विभागांतर्गत येणाऱ्या सर्व **Overhead and Underground LT Line चे Breakdown maintenance** करणे बाबत.
4) लातूर विभागांतर्गत येणाऱ्या सर्व **DTC चे Breakdown Maintenance** करणे बाबत.

सदरील निविदा ई-टेंडरिंग पद्धतीची असून संगणकीय प्रणालीद्वारे भरावयाची आहे. महावितरण मध्ये नोंदणी असलेले ठेकेदार सदरील निविदा भरू शकतात.

महावितरणच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp/** या संकेतस्थळावर सदरील निविदा **दि.10.02.2026** पासून उपलब्ध असेल. निविदा भरण्याची **अंतिम तारीख 19.02.2024** असेल.

निम्नस्वाक्षरी करणाऱ्यास कोणतीही अथवा सर्व निविदा स्विकारण्याचे अथवा डावलण्याचे पूर्ण अधिकार असतील.

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**महावितरण लातूर विभाग**

**PRO No/LZ/27/2025-26 Dt.10.02.2026**



**Name of Change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KADRI JAHIRODDIN MOIENODDIN**
TO **JAHIRODDIN MOINODDIN KADRI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **JAHIRODDIN MOINODDIN KADRI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KADRI JAHIRODDIN MOIENODDIN**
NEW NAME:- **JAHIRODDIN MOINODDIN KADRI**
Address :- SAHEB GALLI, NILANGA. TQ.NILANGA, DIST. LATUR -413521
AADHAR NO.- 835386359367 Mob. No.-997518966

**Name of Change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SYED RESHMAYASMEEN MAZHARQUADRI**
TO **KADARI RESHMA JAHIRODDIN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **KADARI RESHMA JAHIRODDIN** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SYED RESHMAYASMEEN MAZHARQUADRI.**
NEW NAME:- **KADARI RESHMA JAHIRODDIN**
Address :- SAHEB GALLI, NILANGA. TQ.NILANGA, DIST. LATUR -413521
AADHAR NO.- 772487967396 Mob. No.-997518966



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र

**सितारी विमा सेवा केंद्र**

द.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६